

PASS
FAIL
पास की फेल
सनहा पठाण

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहे

# पास की फ़ेल

## लेखिका : सनहा पठाण

# पास की फ़ेल

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फ़ुकट नाही

### हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखिकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

### असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

### दाम नाही मागत. मागत आहे दाद.
### साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# पास की फ़ेल

लेखिका :सनहा शब्बेकदीर पठाण

मु. पो. पिलीव ( कलमवाडी), तालुका - माळशिरस, जिल्हा - सोलापूर

सम्पर्क- मोबाइल व व्हॉट्सॅप – 7774044414

sanaha. pathan@gmail. com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखिकेची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक ई साहित्य प्रतिष्ठान :

www. esahity. com

esahity@gmail. com

प्रकाशन : २० जानेवारी २०२०

©esahity Pratishthan®2020

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची-लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

लेखिकेची ओळख



मला लिखाणाची आवड लहानपणापासून असून मी बरेच छोटे मोठे लेख आणि भरपूर साऱ्या विषयावर बऱ्याच कविता लिहिल्या आहेत पण त्या कधी कुठे प्रकाशित नाही केलं. तसा प्लॅटफॉर्म पण मला कधी मिळाला नाही. बालपण हे माझ्या आयुष्यातले पहिले पुस्तक जे कि प्रकाशित करत आहे. मला ईसाहित्य प्रतिष्ठानने संधीं दिली त्याबद्दल त्यांचे खूप खूप आभार.

मी व्यवसायाने एक इंजिनिअर असून मी अकलूज येथील सहकार महर्षी शंकराव मोहिते पाटील इन्स्टिटयूट ऑफ इंजिनिअरिंगमध्ये सध्या असिस्टंट प्रोफेसरची नौकरी करत आहे.

माझं शिक्षण : माझं पदवी शिक्षण सोलापूरमधून झालं तर माझं १० पर्यंतच शिक्षण हे माझ्या गावात म्हणजे पिलीवला झालं. लहानपणीच्या तसेच इंजिनिअरिंगच्या बऱ्याच आठवणी आहेत ज्या मी पुस्तकरूपी लिहू इच्छिते. चेतन भगत हे माझ्यासाठी नेहमीच रोल मॉडेल आहेत आणि मी प्रयत्न करेन कि मी एक दिवस त्यांच्यासारखी यशस्वी लेखिका होईन. भविष्यात खूप प्रसिद्धी पैसे मिळावा अशी काही अपेक्षा नाही पण मी खूप काही चांगलं लिहावं आणि ते सगळयांपर्यंत पोहोचावं अशी अपेक्षा आहे. मला एक चांगली लेखिका त्याचबरोबर उत्तम वक्ता व्हायचंय आणि त्यासाठी मी नेहमीच प्रयत्नशील राहीन.

सनहा पठाण

अकलूज

माझ्या इंजिनीरिंगच्या सर्व मित्रमैत्रिनींना ही माझी पहिली कादंबरी फेल कि पास समर्पित

प्रिय वाचक मित्रांनो,

प्रथमतः मी पठाण सनहा शब्बेकदीर सर्वांचे मनपूर्वक आभार मानते... माझं पाहिलं पुस्तक ' बालपण ' यास तुम्ही भरभरून प्रेम दिल. मला येणारे ई-मेल, कॉल आणि मेसेज खरंच तुमचा प्रतिसाद माझ्यासाठी बहुमोल आहे. माझं पहिलंच पुस्तक आणि त्यासाठी येणारा प्रत्येक प्रतिसाद माझ्यासाठी खूप नाविन्यपूर्ण आणि खास होता.. इ-साहित्य प्रतिष्ठानचे चे आणि माझ्या सर्व वाचक मित्रांचे मानावे तितके आभार कमी आहे. ह्या धावपळीच्या काळात लिखाणासाठी वेळ काढणे म्हणजे थोडे कठीण काम आहे पण तुमच्यासारखे वाचक मित्र जर प्रतिसादाला असतील तर कठीण कामही क्षणात सोपं होऊन जात. बालपण ह्या पुस्तकानंतर मी लिहिलेल्या कवितांचा संग्रह मी इ साहित्याकडे प्रकाशनास दिला आहे तर तोही लवकरच प्रकाशित होईल आणि तुमच्या भेटीस येईल. प्रेम आणि लग्न ह्या दोन्ही गोष्टी म्हणजे माणसाच्या आयुष्यातील अविभाज्य असा भाग आहे. प्रेमाला लग्नाच्या गाठीत बांधलं कि ते समाजासाठी, नव्या पिढीसाठी एक आदर्श होऊन जातो पण कधी कधी प्रेम हे प्रेमच राहत. ते एकट्याच असो किंवा दोघांचं कधी कधी ह्या प्रेमाच्या माळा लग्नाच्या फुलाने गुंफता येत नाही पण तरीही ते कुठे ना कुठे आठवणीत गोष्टीत आणि शेवटी प्रेम करणाऱ्याच्या मनात तर राहतंच अगदी शेवटपर्यंत... प्रत्येक प्रेमाचा शेवट हा लग्नातच होतो असा नाही काही जणांच्या प्रेमाचा शेवट मनातच होतो. अशीच एक काल्पनिक प्रेमाची गोष्ट म्हणजे पास कि फेल. माझ्या इंजिनीरिंग मधले बरेच किस्से बऱ्याच गोष्टी ज्या कि मी ह्या काल्पनिक कथेत ह्या ना त्या प्रसंगातून घातल्या आहेत. कॉलेजचं वातावरण, परिसर, शहरातील विभिन्न रस्त्यांची, हॉटेलची, दुकानांची नावे, मित्रमैत्रिणींचे नावे, शिक्षकांची ओळख ही काहीशी मी माझ्याच कॉलेज सारखी केली आहे कारण जे आपण अनुभवतो, पाहतो त्या गोष्टींचे वर्णन माणूस पटकन करू शकतो. प्रेमाबरोबर अभ्यासही तितकाच महत्वाचा असतो, आपलं भविष्य घडवणेही तितकेच महत्वाचे असते आणि सगळ्यात महत्वाचं म्हणजे प्रेम मिळो ना मिळो, मित्र मैत्रिणी मात्र जीवाला जीव देणारे भेटतात आणि ते कायम आपल्या पाठीशी असतात कॉलेज संपलं तरीही... कॉलेज बरोबर प्रेम संपत असेल कदाचित पण कॉलेज संपलं म्हणून मैत्री कधीच संपत नाही हाच बहुमोलाचा संदेश मला ह्या आजच्या युवा पिढीला द्यायचाय... शेवटी मी चांगलं लिहिले असेल कि वाईट हे फक्त आणि फक्त तुमच्या प्रतिसादावरूनच ठरू शकत. मी ह्यापेक्षाही चांगलं लिहावं वेगवेगळ्या कथा, कविता या माध्यमातून वेगवेगळे विचार तुमच्यापर्यंत पोहचावे, आणि आपण सगळेच वेगवेगळ्या पुस्तकाच्या वाचनाच्या माध्यमातून एक चांगली आणि आदर्श व्यक्ती

म्हणून जीवन जगावं हीच अपेक्षा आहे आणि त्यासाठी तुम्हाला पुस्तक कसं वाटलं हा प्रतिसाद मला कळवणेही तितकेच गरजेचं आहे तुम्ही जसे नवं नवीन पुस्तकांची आतुरतेने वाट बघताय तसेच तुमच्या प्रतिसादाची आम्ही वाट बघतोय...


लेखिका :पठाण सनहा शब्बेकदीर

शिक्षण : ME ( ELECTRONICS)
व्यवसाय :Assistant professor at SMSMPITR Akluj
इ मेल : sanaha. pathan@gmail. com
ब्लॉग: ***https***://*mysahity. blogspot. com*.
मोबाईल नंबर :7774044414
पत्ता : मु पो. पिलीव, कालमवाडी, ता : माळशिरस, जिल्हा : सोलापूर





http://www. esahity. com/uploads/5/0/1/2/501218/balpan_sanaha_pathan. pdf

प्रस्तावना

तरुणपण हा प्रत्येकाच्या जीवनातील एक असा काळ आहे ज्यात प्रत्येकजण कुठे ना कुठे धडका घेऊन आलेला असतो. शहाणपण येतं ते इथेच. काहीतरी करायचं, करून दाखवायचं ही जिद्द ह्याच वयात असते. तरुण सळसळणार रक्त, भारताची युवा पिढीही तीच. ह्याच तरुणपणात एक महत्वाचा भाग म्हणजे प्रेम. एकदातरी ह्या ना त्या मुलीवर, ह्या ना त्या मुलावर प्रेम हे जडतंच. कोणी त्याला लफडं म्हणत, कोणी त्याला वाईट नादाला लागणे म्हणत, तर कोणी मैत्रीचं नाव देऊन प्रेमाला विराम देतो. कोणी काय म्हणतं तर कोणी काय... मैत्रीचं नातं हे कोणत्याही वयातलं असतं म्हणजे मैत्री ही बालपणात होते, तरुणपणात होते अगदीच काय पण म्हातारपणात पण होते पण तारुण्यातील प्रेम हे वेगळंच असतं. त्यात खाल्लेल्या धडका ह्या कायमस्वरूपी लक्षात राहतात. तरुणपणात कॉलेज हे एक असं ठिकाण होऊन जात जिथं प्रेम आपलं अस्तित्व घेऊन फुलू लागतं. म्हणतात कॉलेजच प्रेम हे कॉलेज पुरतंच मर्यादित असतं, कॉलेज संपलं कि तेही संपत. मग नवीन वाटा नवीन दिशा आणि नवीन प्रेम. पण खरचं संपत का सगळं अचानक ? का राहतात काही आठवणी शिल्लक? सगळेच फेल होतात का ह्या प्रेमाच्या परीक्षेत का पास होणारेही असतात ? प्रेम विसरून नव्याने सुरुवात करणारे बरेच असतात पण ज्यांना विसरताच येत नाही त्यांचं काय ? ज्यांची नवीन सुरुवातच होतं नाही त्यांचं काय ? जे सतत अडकून पडलेले असतात भूतकाळात त्यांचं काय ? असाच एक प्रवास मी पास कि फेल ह्या कांदबरीतून तुमच्या भेटीला आणलाय.

हे पुस्तक त्यातील पात्र हे पूर्णतः काल्पनिक आहे आणि त्याचा कुठल्याही व्यक्तीशी, माणसाशी किंवा घटनेशी काहीही संबंध नाही. जर असेल तर तो निव्वळ योगायोग समजावा.


पास की फेल
भाग १

.....

आज मी दगड झालोय!

आज मी दगड झालोय, संवेदनशून्य, माणसावर एक वेळ अशी येते कि तो इतका हारून जातो कि कोणाकडे तक्रार घेऊन जावे किंवा कोणाकडून अपेक्षा ठेवावे ह्या दोन्हीही गोष्टी व्यर्थ ठरतात... आज मी हरलोय कायमचा.

आरशासमोर एक टक बघत बसलोय, विचार करण्याची शक्ती शून्य झालीय... फक्त एकच विचार सारखा करतोय, मला माहिती होतं मी एक ना एक दिवस नक्की हरणार तो खेळ मी खेळलोच कसा?? मला सगळं काही माहिती असून नदीच्या प्रवाहासारखा का वाहत गेलो मी??? का अडकत गेलो मी त्या गुंत्यात जो कधी सुटणारच नव्हता, आज मला ना कोणाशी बोलू वाटत होतं, ना माझं मन मलाच मोकळं करू वाटत होतं... माझं मनही माझ्यावरच रागावलं होतं कारण ते ओरडून ओरडून जेव्हा सांगत होतं, " तू हरणार तुझा शेवट हा अपयश नक्कीच आहे. " मी ऐकलं नव्हतं त्या वेळेस माझ्या मनाचं हि, ... त्यामुळे स्वतः स्वतःशी काय बोलावं हाही प्रश्न होता.

म्हणतात डोळे खूप काही बोलून जातात... माझे कुठे काय बोलतात फक्त रडतात... प्रेम ह्या शब्दाला समाजात मान आहे सन्मान आहे, प्रेमाला समजून घेणारे करोडो आहेत पण एक तरफा प्रेम म्हटलं कि बघण्याचा दृष्टिकोन बदलतो माणसाचा, लंगडा माणूस कुबड्या घेऊन चालतो तसं, सिम्पती दाखवतात फक्त लोक ह्या प्रेमाला, खरं तर सिम्पत्तीची गरज काय प्रेम

हे प्रेम शेवटी... वेडा म्हणून मोकळे होतात लोक अशा प्रेमाला पण त्यातील जीवाची घालमेल, निस्वार्थी पने ओतलेले प्रेम आणि ती तळमळ हे बोलणारे कोणी नसतील... मी नेहमी तिचे डोळे काय बोलतात हेच बघायचो तिचे काहीच बोलले नाहीत शेवटपर्यंत... माझे मात्र मोठं मोठ्याने ओरडतात आजही... कुठेच आम्ही नव्हतो सगळीकडे होतो फक्त आणि फक्त मी... वेडा म्हणाल तरी चालेल...

आता आहे मी आरशासमोर एक हरलेला वेडा प्रेमी पण जिंकलो नव्हतोच मी... खरं तर जिंकायचं कोणाला होतं... डाव मांडतानाच माहित होतं हार निश्चित आहे... तरी पण का खेळलो मी ????आज मी फक्त पाहत होतो डोळ्यातील आसवांकडे, आता माझीच नजर गेली माझ्या डोळ्यांकडे आजही ते मला काहीतरी सांगतच होते... आठवण करून देत होते त्या चार वर्षाची... ते चार वर्ष जे मी जगलो नव्हतो तर रमलो होतो एका वेगळ्याच विश्वात, हसलो होतो, कित्तेकदा रडलो होतो... आयुष्यातील चार वर्ष म्हणजे तसं फार कमी काळ पण तरीही ते चार वर्ष म्हणजे कितीतरी मोठा कालखंड वाटतो, तो काळ जिथे आपण स्वछंदी होतो, तिथे फक्त आपण आणि आपण होतो... तो काळ जो आयुष्यात पुन्हा येणार नाही खरं, पण विसरताही येणार नाही हेही तितकंच खरं... माहिती होतं मला ह्या चार वर्षानंतरचा काळ फार अवघड आहे, फार भयंकर तरी पण माझ्या जीवनातील हे एक सुखद पर्व आहे आणि त्या पर्वातला एक ना एक क्षण फुलपाखरासारखा जपलाय मी... प्रत्येक अनुभव, प्रत्येक संवाद, प्रत्येक गोष्ट मी माझ्या डोळ्यातून आणि कानातून माझ्या मनापर्यंत पोहोचवलंय जे कि कधीच कोणालाच शक्य नाही माझ्या मनाच्या कप्प्यातून बाहेर काढणे...

पहिले वर्ष... पहिले सत्र

आठवडा झाला होता कॉलेजला येऊन पण मन अजून रमले नव्हते, सगळं काही नवीन होतं राज्य पण नवीन होतं, परराज्यात आलोय हे एकमेकांच्या बोलण्यावरूनच कळतं होतं. मला मराठी सगळंच कळतं होतं पण बोलताना मात्र गोंधळ उडत होता त्याला म्हणण्याऐवजी मी तिला म्हणत होतो, येतोला येते म्हणत होतो. बारावीला एक दोन मित्र होते मराठी बोलणारे आणि घरी काका नेहमी माझ्याशी मराठीच बोलायचे त्यामुळे मराठी माणसाशी संवाद करता येईल इतपत मला मराठी बोलता येत होतं पण समोरचा मला हसणार त्यामुळे मी जास्त बोलणं टाळत होतो. कन्नड येतं, अशीही बरीच मुलं मुली होती मी जास्त करून त्यांच्याशीच बोलायचो. मित्र अशी अजून कोण झालीच नव्हती. कॅम्पस मध्ये बरीच मुलंमुली एकत्र फिरताना दिसायची त्यांच्याकडे बघून थोडं बरं वाटत होतं, मन रमायला काय लागत? बरच काही आहे इथे असं वाटत होतं... मला लहानपणापासूनच आज काय झालं ते रोजनिशी लिहायची सवय होती, नंतर मी छोटे मोठे लेख लिहायचो, अनेक कविताही केल्या होत्या पण आयुष्यात त्या कधी कोणाला वाचनाला नव्हत्या दिल्या. माझं स्वप्न होतं कि मी चेतन भगत सारखं काहीतरी मोठं लिहावं... रोजनिशीत पण नवीन नाविन्यपूर्ण लिहिण्यासारखं काही नव्हतं... कविता लिहिण्यासारखंही मला काही भेटत नव्हतं... लेक्चरला मात्र पूर्ण लक्ष असायचं. मी रोज पहिल्याच बेंच वर बसायचो, ठरवलं होतं चांगले मार्क्स घेऊन मी माझ्या आई वडिलांची स्वप्न पूर्ण करणार, खूप कष्टाचे दिवस काढले होते त्यांनी इतक्या वर्षात, माझ्या शिक्षणासाठी त्यांनी बरच काही गमावलं होतं फक्त याच आशेवर कि मी एक दिवस त्यांच्या कष्टाचं चीज करेन, आणि मला तो दिवस लवकरच आणायचा होता...

आज पण नेहमीप्रमाणे लेक्चरला पुढेच बसलो होतो, अप्लाइड मेकॅनिक्स लेक्चर होतं. सर फार कडक स्वभावाचे होते पण तेवढेच इंटरस्टिंग आणि समजूतदारपणे शिकवायचे. कोणाचं लक्ष नसेल तर खडू फेकून मारायचे आणि म्हणायचे, "**concentrate here** ".

त्यामुळे खडू फेकून अपमान होऊ नये हे सगळ्यांनाच वाटायचं म्हणून लक्ष विचलित करायचा प्रश्नच येत नव्हता. लेक्चर संपलं कि सर प्रेझेंटी घ्यायचे. बरीच मुलंमुली अजून कॉलेज चालू झाल्यापासून आलीच नव्हती. कोणी नवीन दिसलं कि सर उभा करून इतके दिवस का नाही आलात हे विचारायचे. एक मुलगी नवीनच आली होती ती इतके दिवस का आली नाही याची कबुली देत होती, " मी हॉस्टेलला ॲडमिशन घेतलंय, कालच माझे पालक सोडून गेले."

मला तसं पण तिच्या बोलण्या मध्ये काही रस नव्हता पण जास्त मुलंमुलीही प्रॉपरचीच होती, हॉस्टेलची मोजकीच म्हणून मी मागे वळून पाहिलं कि ती कोण आहे, तेव्हा मी पाहिलं तिला पहिल्यांदा आणि मनात भरली कायमची, आत्तापर्यंत...

तीचं वर्णन करायला ना ती कोण ऐश्वरिया राय होती ना कतरीना कैफ... वेगळीच होती ती... मी नकळत ओढला जात होतो तिच्याकडे... प्रेयसी म्हणून माहिती नाही पण कोणत्याही मुलाला लग्नासाठी ही कशी आहे विचारल्यावर नाही कोणीच म्हणणार नाही अशी होती ती...... एखाद लहान मुलं कसे असते, कशीही असो गोंडस छानच वाटतात, तशी होती ती... माझ्या शब्दात म्हणायला गेलं तर गोडं होती ती... उंच होती ती कदाचित माझ्यापेक्षाही जास्त... कदाचित त्या वेळेस वाटत होतं पण आता कन्फर्म झालंय होती ती माझ्यापेक्षाही उंच... चष्मीश... म्हणतात ना चष्मीश मुली क्युट असतात कदाचित खरं असावं नाक मात्र माझ्यापेक्षा कमी होतं पण नकटी नव्हती... नाकात सानिया मिर्झा घालती तशी नथनी घातली होती... सानिया मिर्झा पण मला खूप आवडत होती... जीन्स आणि फारच शॉर्ट टॉप घातलेला होता... जास्त काही पांढरीशुभ्र अशी गोरी नव्हती पण माझ्यापेक्षा तिला कलर जरा जास्तच असावा... मलाच कळत नव्हतं मी तिच्याशी का कम्पेअर करत होतो तेव्हाही आणि आजही... सांगायचं झालं तर छानच होती ती... झाडाला नुकतंच फुललेल्या गुलाबाच्या फुलासारखी होती ती, कोणालाच तोडू वाटणार नाही पण सदैव बघत बसावं अशी होती ती... पावसानंतर एखादे टपोरे थेंब जशे एखाद्या पानावर रेंगाळत तेव्हा ते खाली पडूच नये वाटत त्या थेंबासारखी, माझ्या मनाच्या बागेतील फुलपाखरासारखी होती ती ...

मला वेड लागलं होतं अप्लाइड मेकॅनिक्स च्या लेक्चरपासून वाटत होतं उठावं आणि आणि मागे जाऊन बसावं पण नाही उठलो... त्या लेक्चर पासून शेवटपर्यंत एकही लेक्चर ला लक्ष लागलं नाही. कॉलेज सुटलं, सर गेले मी मात्र उठलोच नाही जागेवरून, मला पाहायचं होतं तिला जाताना... बघितलेच शेवटी मी तिला जाताना... गालातल्या गालात हसत होतो मी... मी स्वतःशीच हसत हसत बोलत होतो, " आता रोज करमणार मला ". इंजिनीरिंगला ऍडमिशन घेतल्याचं सार्थक झालं होतं... **love in first sight** बहुतेक तेच झालं होतं... फक्त हसत होतो मी गालातल्या गालात... ब्रश करताना, आंघोळ करताना, आरशासमोर तर कित्तेक वेळ उभं राहून हसायचो... जेवताना हे नको ते नको करणारा मी काय खात होतो माझंच लक्ष नव्हतं... पक्का वेडा झालतो मी ... आजही आहे. डोक्याला तेल लावायचं विसरत होतो, पायात सॉक्स

घालायचे विसरत होतो, फोन आला तरी कानापर्यंत रिंग चा आवाज पोहचत नव्हता. कान काहीतरी वेगळंच ऐकत होते, डोळे काहीतरी वेगळंच पाहत होते आणि मनावरचा तर ताबाच सुटला होता.

पहिले पंधरा वीस दिवस कॉलेज दोन वाजेपर्यंत असायचं, प्रॅक्टिकल होतच नव्हते. मी दुपारी बारा नंतर मागच्या बेंच वर जाऊन बसायचो कारण ती मागे बसायची. मला टॉपर यायचं होतं, ते म्हणजे पहिलं आईवडिलांसाठी दुसरं म्हणजे तिझ्यासाठी. असं तर ती मला ओळखतही नव्हती लक्ष पण देत नव्हती निदान टॉपर आल्यावर तरी ती लक्ष देईल म्हणून... ती क्लास मध्ये खूप शांत असायची, आली तो पूर्ण आठवडा तर एकटीच मागे बसायची आता कोणीतरी एका मुलीसोबत बसते ते पण मागेच... युनिफॉर्म अजून कोण घालून येत नव्हतं एक दोघे सोडले तर पण ती मात्र रोज जीन्स वर यायची. पंजाबी ड्रेस बहुतेक नसतील तिझाकडे. मला मात्र तिला पंजाबी ड्रेस मध्ये पाहायचं होतं. पंजाबी ड्रेस मध्ये मुली आणखीनच सुंदर दिसतात असं ऐकलं होतं मी. बारा वाजता लंच ब्रेक झाला कि मी तिला पाहण्यासाठी मुद्दाम क्लास च्या बाहेर जाऊन थांबायचो पण ती रोबट सारखी ताडकन उठून निघून जायची. इकडे तिकडे बघायची भानगड पण नसायची. कधी कधी असं वाटायचं तिझी मान ९० डिग्री मध्ये माझ्याकडे रोटेट करावी. पण ते फक्त मी स्वप्नच बघू शकत होतो असं काही होणार तर नव्हतंच. दोन वाजता पण कॉलेज सुटल्यावर ती ताडकन बुलेट च्या गोळीसारखी निघून जायची मागचा पुढचा विचार न करता. इकडे तिकडे न पाहता. ती नेहमी मला एकटीच दिसायची, होस्टेलवर जाताना येताना. कॉलेज दोनला जरी सुटत असेल तरी कॉलेज बस पाच लाच निघायची त्यामुळे सिटीत राहणाऱ्या मुलांना पाचपर्यंत थांबावच लागायचं. एकमेकांबरोबर बोलत बसणें, कॅम्पस मधून फिरणे, कॅन्टीन मध्ये टाईमपास करणे यात वेळ घालवायचो. पण ही एकटीच ताडकन हॉस्टेलला निघून जायची माझ्या मनात विचार यायचा कदाचित ती अभ्यास करत असावी हॉस्टेलला जाऊन. बॅक बेंचर्सच नेहमी टॉपर येतात हेही ऐकलं होतं मी. ती टॉपर आली तर भारीच तिला कॉम्पिटेशन मध्ये मी असेन आणि मग तरी तीच लक्ष माझ्याकडे जाईल हे असले खुळ्यासारखे विचार माझ्या मनात येऊन मी पार गांगरलो होतो.

मलाच खरं तर हॉस्टेलला राहायचं नव्हतं म्हणून मी सिटीत राहायचा विचार केलेला आणि कॉलेज बस नि प्रवास करायचा असं ठरवलेलं पण आता वाटत होतं निर्णय चुकीचा

होता. हॉस्टेलला राहिलो असतो तर रविवारी सुट्टीच्या दिवशी कॅन्टीन मध्ये इकडे तिकडे फिरताना ती दिसली असती आणि माझं तिच्यापर्यंत पोहोचणं आणखीन सोप्प झालं असतं. जवळ जवळ पंधरा वीस दिवस झाले होते कॉलेज सुरु होऊन पण. मला साधं तीच नावही माहित नव्हतं. सरांनी पण तीच नाव विचारलं नव्हतं तिला उभं केलेलं तेव्हा. मला तीच नाव माहिती करून घ्यायचं होतं पण काहीच सुचत नव्हतं कुठून शोधायचं.

बिना देशी पिताच बहुतेक मला रोज चढत होती. माझी रूम सिटीत होती सात रस्त्याला. विश्वास आणि दीपक हे माझे रूममेट्स, माझ्याच कॉलेजला होते फर्स्ट इयर ला. विश्वास मेकॅनिकलचा, दीपक इलेक्ट्रिकल चा आणि मी कॉम्पुटर चा. पण पहिलं वर्ष हे सगळ्यांचं सारखंच होतं. फर्स्ट इयर च्या चार डिव्हिजन होत्या. ते दोघे ' **C '** डिव्हिजन चे आणि मी ' **B'**. त्यांच्यासोबत राहून आता मला बऱ्यापैकी पैकी मराठी बोलता येत होतं पण तरीही मी कॉलेज मध्ये ते दोघे आणि माझा बेंचमेंट आकाश ह्यांच्या व्यतिरिक्त मराठी मुलांशी बोलायला घाबरत होतो ते हसतील म्हणून. विश्वास तर नेहमी म्हणायचा , " तू १० दिवस आमच्यासोबत राहिलास तर मराठी शिकू शकतो पण आम्ही आयुष्यभर जरी तुझ्याबरोबर राहिलो तरी कन्नड काही शिकता येणार नाही. तू काय काय कुडकुड करतोस फोनवर काहीच ताळमेळ लागत नाही". मग आमच्या दोघांचं मराठी भाषा सोप्पी कि कन्नड ह्यात वाद व्हायचे तो कोणाला ऐकणार साला नेहमी स्वतःचच खरं करायचा.

मी कॉलेज मधून आलो कि सारखा आरशासमोर उभा राहायचो. माझ्या चेहऱ्यावर एक वेगळीच स्माईल असायची. गालातल्या गालात असते तीवाली. पण हे नालायक मित्र असतात ना खूप वाईट असतात. मित्राचं अजून कशात काही नाही आणि ह्या साल्यांना वास कुठून येतो देव जाणे. मला आठवतो तो दिवस त्या दिवशीही मी गालातल्या गालात सारखा हसत होतो आणि साल्यांचं सगळं संभाषण माझ्यावरच होतं.

*दीपक : विश्वास*

विश्वास मोबाईलवर बघत बघतच *"हम्म्म्मम्मम्म"* असा रिप्लाय दिला

*दीपक : ऐक कि*

विश्वास मोबाईलमधून डोकं बाहेर न काढताच रिप्लाय देत होता

*विश्वास :, " ऐकतोय बोल"*

*दीपक : राजूच वागणं तुला वेगळं वाटतं नाही का ??*

विश्वास काही बोलायच्या आत मीच बोललो

*मी : काय वेगळं वाटतंय ??*

विश्वास लगेच हातातला मोबाईल बाजूला ठेवत दिप्याची बाजू घेतली

*विश्वास : राज्या खरं सांग तुझं चाललंय काय ?*

*मी: पहिली गोष्ट राजू म्हण किंव्हा राजेश्वर म्हण*

पण ह्या वेळेस त्याने राज्या म्हणलेलयाचा राग नव्हता आला मला हे त्यालाही कळलं होतं आणि अजूनही मी गालातल्या गालात हसतच होतो

*विश्वास : मग सांग काय चाललंय ते*

*मी : कुठे काय ? उगीच आपलं तुम्ही लावलाय, काय चाललोय आणि काय चाललोय*

दीपक नेहमीप्रमाणे माझ्या मराठीच्या चुका काढायला पुढे सरसावला, त्याला माझ्या पुढे जणू काय त्याने मराठीत **PHD** केल्याचा फील यायचा

*दीपक : पहिली गोष्ट ते चाललोय नसतं. चाललंय असतं*

अजूनही मी हसतच होतो. हसत हसतच मी टिफिन घेतले

*मी : चला रे भूक लागलीय, डबे खाउयात, उगीच काहीतरी तुमचं*

मी जेवणासाठी उठलो तसं दोघांनी दोन्हीकडून घेरलं

मी अजूनही हसत हसत त्यांच्याकडे पाहत होतो

*मी : काय*

*दीपक : कुठे काय*

विश्वास चे एक्सप्रेशन वेगळेच होते, त्याने लगेच त्याचा फिल्मी अंदाज चालू केला, त्याला शेर शायरी म्हणायचं खूप वेड होतं आणि मला त्याची शेर शायरी नेहमी बोर वाटायची

*"ये इष्क का नशा है राजू*

*ना जमानेसे छुपा है*

*ना हमसे छुपेगा "*

माझं खरंच आता डोकं फिरलं होतं, मी दिप्याला म्हणालो, "दिप्या सांग ह्याला काय बरळतोय ". मात्र त्या दोघांचं चालूच होतं

*विश्वास : छोड राजू*

*दोस्त दोस्त ना रहा*

*दीपक : दुश्मन हुआ जमाना*

*मी : काय चाललंय तुमचं, चला यार भूक लागतोय*

हा दीपक सुधरण्यातला नव्हताच, पुढे बोललाच

*दीपक : भूक लागतोय नसतं, लागलीय असतं*

*मी : कसले मित्र यार तुम्ही घ्या ना समजावून*

*दीपक : समजून*

विश्वास आता पक्का चिडला होता

*विश्वास : सांगतो का आता का तुझे दात आणि माझा हात*

*ये धाई किलो का हात जब किसीपे पडता है तो आदमी उठता नाही उठ जात है*

मी विश्वासकडे रागाने पहिले आणि जेवायला बसलो, पुढे त्या दिप्याचं बरळणे चालूच होते

*दीपक : लोकांना धडस, मराठी नीट बोलता येत नाही आणि बरं का विश्वास म्हणे प्रेम झालंय*

ह्या साल्यांना कुठून एवढ्या लवकर भनक लागते मला तेच काळात नव्हतं, माझ्या मनापर्यंत कोण पोहचूच शकत नाही असं मला वाटत होतं पण हे मनात काय स्वर्गात पण पोहचतील याची आता मला खात्री झाली होती. मला तसंही त्यांच्यापासून काही लपवायचं नव्हतं तेच काय मला कोणापासूनच, अर्थात तिच्यापासूनही काही लपू नये असं वाटतं होतं, लपून छपून करतात ते खरं तर प्रेम नसतंच असं माझं वैयक्तिक मत होतं त्यामुळे आता सांगून टाकायचं हे मी ठरवलं होतं. मी पुढे बोललो, " प्रेमाचं आणि भाषेचं काय कनेक्शन ??"

विश्वास चे डोळे लगेच फिरले

*विश्वास : म्हणजे प्रेम झालंय तर... वा यार कॉलेज मध्ये धडसं महिना नाही झाला और मेरे यार को प्यार हो गया*

मी जेवता जेवताच स्मित हास्य करत होतो

*दीपक : कोणाचे नशीब फुटले रे राजू*

दोघे एकमेकांकडे बघत हसत होते. पुढे विश्वास म्हणाला, "तिला कन्नड येत असेल तर ठीक नाही तर चांगलाच मेळ लागला. राजू कसा म्हणेल, तुझे काय चालले रे ".

पुन्हा दोघांचं ते मिश्किलीत हसणं, त्यांचं हसणं मला फार खटकत होतं. दोघांच्या तोंडातील बत्तीशी बाहेर काढावी असं वाटतं होतं. पुढे दीपक नि अंत्यंत महत्वाचा प्रश्न विचारला, "नाव काय तीच ?"

मला नाव गाव काहीच माहिती नव्हतं, मी काय सांगणार होतो मी सरळ म्हणालो माहित नाही

पुढे त्यांचे एकावर एक प्रश्न चालू झाले...

*विश्वास : सात रस्त्याची आहे*

*मी : नाही*

*दीपक : गावाकडची*

*मी : नाही*

*विश्वास : कॉलेजमधली*

मी हो म्हणून फक्त मान हलवली आणि पुन्हा स्मित हास्य. माझ्या स्मित हास्यावर चिडून दीपक म्हणाला, "विश्वास, हा पुन्हा असं हसला ना तर मी ह्याच थोबाड रंगवीन, काही सांगत नाही फक्त हसतोय. "

विश्वास कसल्या तरी गूढ विचारात होता

*विश्वास : साला, इथे महिना नाही झाला, अजून आपल्या क्लास मध्ये किती मुली हे धडसं माहिती नाही आणि हे बघा, मजनू चले लैला ढुंढणे*

मी अजूनही फक्त हसत होतो, पण त्या दोघांचे प्रश्न काही संपत नव्हते

*विश्वास : बरं एक सांग, नक्की तुझा डिव्हिजन मधली, आमच्या कि दुसऱ्या कुठल्या*

*दीपक : आणि plz सिनियर मुलींची नाव घेऊ नकोस*

आता लपवण्यात काहीच अर्थ नव्हता, नाहीतर ह्यांनी शेजार पाजारच्या नाक्यावरच्या कुठल्या कुठल्या मुली शोधल्या असत्या काय माहिती, नशीब माझं ह्यांनी मेसवाल्या काकांची मुलगी अजून इथपर्यंत सर्व्हे नव्हता केला. पुढे मी म्हणालो, "तुमच्या राहूद्या तुम्हालाच, ती माझ्याच डिव्हिजन मधली आहे"

आता तर खार प्रश्नांना उधाण येणार होतं

*विश्वास : कोण तुझा डिव्हिजन मधली*

*मी : असं विचारतोय जसं तुला माझ्या डिव्हिजन मधल्या मुली माहितीच आहेत*

*विश्वास : नाव ?? गाव ??*

*मी : सांगितलं ना काहीच माहिती नाही*

*दीपक : ती बोलली तुझ्याशी*

*मी : नाही ना*

*विश्वास : तू बोललास का ?*

*मी : नाही ना*

*दीपक : love in first sight*

*मी : हो ना*

विश्वास आता जाम चिडला होता तो मोठयाने ओरडू लागला, "डोक्यात दगड घालू का तुझ्या, काय लावलाय हो ना आणि नाही ना"

मी निर्लज्जसारखा फक्त हसत होतो

*दीपक : सिटीत राहते कि हॉस्टेलला*

*मी : हॉस्टेल*

दिपकला आता मी रूम सोडून जातो कि काय ही भीती वाटत असणार हे मला माहितीच होतं आणि अगदी तसंच झालं तो बोललाच, "म्हणजे तू रूम सोडणार हॉस्टेलला जाणार "

मी फक्त हो म्हणून मान डोलावली, मला दोघांचे एक्सप्रेशन काय येतात ते पाहायचं होतं

*दीपक : इथलं एका महिन्याचं भाडं आणि राहिलेलं deposit भरल्याशिवाय कोण कुठे जातो तेच बघतो*

*मी : काय यार तुम्ही पराचा कावळा करताय पुढच्या सेमला बघू काय करायचं ते*

मी काय म्हणालो ह्या पेक्षा मला पराचा कावळा हे कसं काय आलं हेच त्या दोघांना कळतं नव्हतं म्हणून मीच त्यांना सांगितलं, जास्त आश्चर्य करू नका, "काका मराठी मधून GRADUATE आहेत ते वापरतात असल्या म्हणी". पण त्या साल्यांना माझ्या म्हणी पेक्षा मुलीत जास्त इंटरेस्ट होता

विश्वासच परत चालू झालं

*विश्वास : दिसायला कशी आहे*

*मी: गोड*

*दीपक : नक्की मुलीवरच प्रेम करतोस ना कि साखरेवर ??*

*विश्वास : दीपक प्रेमात पडलेली माणसं असच बोलतात*

*दीपक : म्हणजे*

*विश्वास : छानला गोड, आणि ते शोना, बच्चा वगैरे*

परत दोघे बत्तीशी काढून हसू लागले

*विश्वास : उद्या दाखव आम्हाला राजू*

मीही त्या दोघांना उद्याच आश्वासन देऊ केलं होतं पण ते कितपत पूर्ण करणार होतो कोणास ठाऊक, कारण मीच तिला पाहण्यासाठी काय काय उठाठेव करत होतो मलाच माहिती

सकाळी ८. १५ वाजता कॉलेजची बस आली. आम्ही तिघेही सात रस्ता स्टॉप वरून चढलो. बस मध्ये अजूनही दीपक आणि विश्वास मला चिडवत होते, होम मैदान, भैय्या चौक इथूनही बरीच मुलं मुली होती कॉलेजला जाणारी. काही माझ्याच क्लास मधली होती पण अजून ओळख झाली नव्हती. बस नेहमी १०, १५ मिनिट लवकर पोहोचायची कॉलेज वर, आम्ही कॅन्टीन च्या बाहेर जाऊन बसलो. कधी कधी ती यायची कॅन्टीनला सकाळी नाष्ट्याला तेव्हा दिसायची. रोज मी एकटा बसून तिची वाट बघायचो आज आणखीन दोघे होते. मला मी जणू मुलगी पाहायला आलोय आणि माझ्याबरोबर दोन जाणती माणसं आलीत असं वाटतं होतं. ९. १५ चे ९. ३० झाल्या. क्लासला १५ मिनिट उशीर झाला होता पण ती काय आली नाही.

*विश्वास : रोज नाश्ता नाही का करत*

*दीपक : राजूला विचारून करत असणार*

दोघेही परत बत्तीशी घेऊन हसू लागले, मला खरंच माझ्या हाताचा हातोडा करू वाटतं होतं

मी क्लास मध्ये गेलो जाता जाता , मी नकळत तिला शोधण्यासाठी पाठीमागे पहिले ती नव्हती. मला काही सुचेना, माझा क्लास मधला मित्र आकाश होता, मी आणि तो नेहमी २ ऱ्या बेंच वर बसायचो. त्याने माझी जागा रिकामी ठेवली होती, मी मात्र सरळ मागे जाऊन बसलो. आणखीन एकदा सगळ्या मुलींमधून नजर फिरवली ती एकदम पलीकडच्या सेकंड नंबर रोला बसली होती. तिने तिच्या केसात वेगवेगळ्या रंगीबेरंगी बाहुल्यांच्या आकाराच्या पिना लावलेल्या. ती अजून लहानच आहे असं मला वाटतं होतं. आज तिने युनिफॉर्म घातलेला स्काय ब्लू कलरचा शर्ट आणि डार्क ब्लू कलरची जीन्स आणि तीच ते इनोसंट फेस. मला ती नेहमी लहान, गोंडस, गोड अशीच वाटतं होती. त्यात तिच्या नाकावरचा चष्मा तिला शोभून दिसायचा. तिचे डोळे खूपच अट्रॅक्टीव्ह होते. तिच्या चष्म्यातूनही तिच्या डोळ्यांचं तेज लपत नव्हतं. सगळ्यात जास्त मला तिचा इंनोसन्स फेस आणि तिच्या सानिया मिर्झासारखी रिंग घातल्यावर उठून दिसणार नाक ह्या दोन गोष्टी जाम आवडायच्या. ती मला काही कमी सानिया मिर्झाच वाटायची तिची हाईट, पर्सनॅलिटी काही कमी सानिया मिर्झा सारखीच होती.

आजकाल माझं लक्ष सरांच्या शिकवण्याकडे कमी आणि तिच्याकडे जास्त असायचं. माझं एकचं मोटिव्ह होतं तीच नाव. मधल्या सुट्टीत सुट्टी संपली तरी मी लवकर क्लास मध्ये जातच नव्हतो. ती त्या रोबोट सारखी यायची ना ते बघूनच आत जायचो. नेहमीप्रमाणे आजही मी मधल्या सुट्टीनंतर क्लास च्या बाहेर तिची वाट पाहत उभा होतो पण फरक हा होता, विश्वास आणि दीपक हे दोन डोंबकावळे माझ्यासोबत तिला पाहण्यासाठी थांबले होते. त्यांना आज तिला पाहायचं होतं नाहीतर आज माझं रूमवर अस्तिविसर्जन होणार होतं.

विश्वास कुठल्याही येणाऱ्या जाणाऱ्या मुलीकडे बघून म्हणायचा, "हि का "

मी अह्ह्हह्हह्ह म्हणून मान हलवायचो

*दीपक :काय यार राजू, सकाळी १५ मिनिट लेट झालं आम्हाला, माहितीय सर किती ओरडले*

*मी : जावा ना मग, तुला कोण पाहायला सांगितले*

*विश्वास : दिप्या चूप कर,*

*आज तो यार के यार का दिदार करकेही जायेंगे*

तेवढ्यात मी बोललो, "शांत बसा ती आली आली "

आली आली म्हणेपर्यंत आणि दाखवेपर्यंत ती क्लास मध्ये शिरली. दोघांनीही बोलण्याच्या नादात धडस काही पाहिलंच नाही.

*दीपक : काय यार राजू एवढ्या फास्ट कुठे चाललेत का ?*

*विश्वास : ये बुलेट ट्रेन हे राजू तेरा इंजिन खराब होनाही होना है, चल दिप्या क्लास मध्ये जाऊन बघू*

तेवढ्यात सर क्लास वर गेले आणि दीपक नि मला कोपरापासून हात जोडून नमस्कार केला

*दीपक : आम्हाला नाही पाहायचं तू तुझं बघ, चल विश्वास, सर येतील आपले*

दोघे क्लास मध्ये गेले मीही मुकाट्याने क्लास मध्ये जाऊन बसलो. आजकाल मी चौथ्या किव्वा पाचव्या बेंच वर बसत होतो कारण तिथून ती दुसऱ्या बेंचवर बसलेली स्पष्ट दिसायची. माझं खरंच सर काय शिकवतेत ह्या कडे लक्ष नसायचं. दुपारनंतरचे लेक्चर हे संपूच नये असं वाटायचं, कोण पेंगायचं, कोण जांभळ्या द्यायचं, माझं मात्र फुल्ल कॉन्सन्ट्रेशन फक्त आणि फक्त तिच्यावर...

मी नाव शोधण्यासाठी किती कट कारस्थान करत होतो हे मलाच नाही माहिती. माझ्या बरोबर क्लास मध्ये सोबत असायचा तो आकाश हॉस्टेललाच राहत होता. काय होऊ शकेल ते आकाश कडूनच हे मला माहित होतं. आकाशच्या गावाकडच्या मुली पण होत्या हॉस्टेलला त्यामुळे शक्यता जास्त होती.

सुनीता ही आकाशाची खूप छान मैत्रीण बनलेली व ती होस्टेललाच राहत होती. दोघे सारखे एकत्र दिसायचे, सकाळी कॅन्टीन मध्ये, दुपारी क्लास च्या बाहेर, कॉलेज सुटल्यावर परत कॅम्पस मध्ये, कॅन्टीन मध्ये. आमचं कॉलेज जरी ४. ३०ला सुटत असेल तरी बस ५. ३० लाच निघायची, रोज १ तास पुरेसा होता नाव शोधायला.

कॉलेज सुटल्यावर मी दीपक आणि विश्वास पेक्षा आकाश बरोबर जास्त फिरत होतो. साहजिकच ते दोन डोंबकावळे माझ्यावर जास्त चिडले होते. शेवटी मित्रच कितीही शिव्या दिल्या तरी राग निवळतोच. मी आकाश आणि सुनीता सोबत कॉलेज सुटल्यावर फिरू लागलो. आकाश आणि सुनीता चे टॉपिक कधी कधी मला खूप बोर करून सोडायचे पण ते बोर पण सहन करायची तयारी होती माझी. मधेच ती सुनीता मला काहीतरी प्रश्न विचारायची, ना मला तिच्या प्रश्नात इंटरेस्ट असायचा ना उत्तरात. मी काय उत्तर द्यायचो माझी मलाच नाही कळायचे. कधी कधी आकाश च्या डोक्यात दगड घालू वाटायचा.

*आकाश : सुनीता तू काय घेणार*

*सुनीता : काही पण मागव*

*आकाश : असं नाही, तू सांग तुला काय आवडत*

*सुनीता : तुला काय आवडत, ते मागव*

ह्यांच्या आवडी निवडीचा एवढा संताप यायचा पण शेवटी नाईलाज

एके दिवशी मीच विचारलं सुनीताला, “कसे वाटते सुनीता होस्टेलवर”

*सुनीता : छान आहे, का रे*

*मी : सहज विचारले, मैत्रिणी वगैरे झालीत का ?*

सुनीता हसू लागली, " मैत्रिणी झालेत का असं म्हणतात ".

मला अजून पण मराठी व्यवस्थित बोलता येतच नव्हतं पण नाईलाज होता. मी बोलणं चालूच ठेवलं, “ते मराठी कधी कधी असं होतं, बरं सांग कि झालेत का मैत्रिणी वगैरे ”

आकाश साला माझ्याकडे वेगळीच नजरेने पाहत होता पण मी इग्नोर मारलं

*सुनीता : हो झालेत कि*

*मी : आमच्या डिव्हिजन मधल्या*

*सुनीता : हो, पूनम वगैरे*

मी शेवटी नाईलाजाने हो हो म्हणालो पण शेवटी आमच्या डिव्हिजन मध्ये तीन जण होत्या हॉस्टेल च्या, नक्की पूनम कोण मला कळेना. आकाशला डायरेक्ट सांगितलं तर तो माझी जाम खेचणार होता. आधीच दोन डोंबकावळे कमी होते का, त्यात ती सुनीता, तो आकाश तिला सांगणार, मला काय करावं तेच कळतं नव्हतं

शेवटी रात्री डोंबकावळ्यांनी विचारलं

*विश्वास : सापडलं का मग नाव*

*मी : नाही अजून*

*दीपक : फिर फिर, अजून फिर त्या आकाश आणि सुनीता सोबत*

मी चिडून म्हणालो, " तुमच्यासोबत फिरतो, देताय नाव शोधून ?"

*विश्वास : नाम मे क्या रक्खा है, तू डायरेक्ट काम कर*

*मी : कसलं काम*

*विश्वास : प्रोपोझ कर तिला*

*मी : बनवा बनवा अजून प्लॅन बनवा मला मारायचा, कसले दोस्त यार*

*दीपक : दहा दिवस झाले दाखवतो दाखवतो म्हणतोय, तू कसला दोस्त*

*मी : कोपरापासून नमस्कार कोणी केला*

*विश्वास : त्याने केला मी नाही. मी सांगतो पटती कि नाही*

*मी : उद्या सकाळी क्लास च्या बाहेर थांबू*

*विश्वास : राहूदे, तुझी बुलेट ट्रेन कधी येति आणि कधी जाती, कळतंच नाही*

*मी : तू उद्या आमच्या क्लास मध्ये बस, कोणी विचारलं तर म्हणायचं, चुकून आलो लेट ॲडमिशन*

*दीपक : काय नडलंय विश्वास, तुझी अबसेन्टी लागणार आपल्याकडे*

*मी : विश्वास, तुला बघायचं असेल तर चल नाहीतर राहूदे परत म्हणू नको दाखवलं नाही म्हणून*

विश्वास एवढा बिन्दास्त होता कि तो काय घाबरतोय होय यायला, तो एका पायावर तयार झाला

मी विश्वासला घेऊन क्लास मध्ये गेलो, आकाशला कळतंच नव्हतं हा क्लास मध्ये का आलाय

शेवटी मी एक्सप्लेनेशन दिलं, " अप्लाइड मेकॅनिकसला आपल्याला चांगलं शिकवतेत ना, त्यांना दुसरे सर आहेत त्यांचं कळत नाही म्हणून आलाय " आकाशला कळत होतं काहीतरी शिजतंय तरी पण त्याने होकारार्थी मन हलवली. ती क्लास मध्ये आली दुसऱ्या बेंच वर बसली.

मी विश्वासला खुणवलं, “विश्वास, तिकडे बघ, सेकंड बेंच वरची त्या कडेची, दरवाज्याकडची ”

विश्वास पायाच्या नखापासून केसापर्यंत स्कॅन करत होता

*विश्वास : भारीय यार, काय पर्सनॅलिटी आहे*

*मी : आत्ता शांत बस, सर बघतील*

आमची कुजबुज चालू असताना सरांनी पाहिलं, पिन ड्रॉप सायलेन्स लागायचा सरांना, अप्लाइड मेकॅनिकस चा तास होता, नेहमीप्रमाणे सरांनी रागाने चॉक आमच्यावर फेकले आणि नॉन्सेन्स म्हणून जोरात ओरडले, झालं झटक्यात माझी इमेज खराब झाली. परत स्टॅन्ड अप म्हणून ओरडले

दोघेही उभे राहिलो. सरांची आमच्यावर जोरात फायरिंग चालू होती, “what the hell you discussing tell me ”

आम्ही दोघे फक्त खाली मान घालून उभे होतो, सरांनी पुढे विचारलं, " what’s your name ?"

*मी : me ??*

*सर : yes, you*

*मी : राजेश्वर वाकोळे*

मी नाव सांगता सांगता तिच्याकडे पाहत होतो, नशीब ती सरांकडे पाहत होती माझ्याकडे नाही

परत सर विश्वास कडे पाहत मोठयाने ओरडले, " n, you ??"

*विश्वास : विश्वास शिंदे*

क्लासची स्ट्रेंथ एवढी होती कि सरांच्या लक्षात येणारच नव्हतं आकाश साला माझ्याकडे बघून हळूच हसत होता.

सर पुढे ओरडले, " concentrate here, otherwise get out "

दोघेही सॉरी म्हणून खाली बसलो, मी अधून मधून चोरून पाहायचो तिच्याकडे. मधली सुट्टी झाली, सरांनी बोललेलं माझ्या मनाला जास्त वाईट वाटलं नव्हतं तितकं तिला माझ्याबद्दल काय वाटलं असेल याच दुःख होतं मला. विश्वास नि विश्वासघात केल्यासारखं वाटत होतं मला, बाहेर दीपक वाटच पाहत उभा होता आमची, क्लास च्या बाहेर येईपर्यंत माझी बुलेट ट्रेन निघून गेली होती.

*दीपक : बघितली का ?*

*विश्वास : मग काय, नादच नाय*

मी फार रागात होतो, मी विश्वास वर ओरडलो, " त्या सरांनी पण आपल्याला बघितलं ते पण सांग ना "

*विश्वास : काय यार, हे सर लोकांचं कशाला मनाला लावून घ्यायचं राजू, just chill*

*मी : सरांचं नाही, ती काय विचार करेल माझ्याबद्दल*

दोघेही हसायला लागले परत बत्तीशी घेऊन

*विश्वास : ती कुठे ओळखते तुला विचार करायला*

मी रागातच होतो, टिफिन घेऊन आकाश सोबतच जेवायला निघून गेलो

नेहमीप्रमाणे सुनीता होतीच. मी शेवटी माझा नेहमीचा विषय काढला

*मी : आमच्या क्लास मधल्या किती मुली आहेत हॉस्टेलला ?*

*सुनीता : अम्म्म बहुतेक, तीन*

मी जरी विचारलं असतं कोण तीन परत तिने तीन नाव सांगितली असती पण त्यात तिझ नाव कुठलं कसं कळणार. मी पुन्हा एकदा शांत बसलो, जवळ जवळ दहा ते पंधरा दिवस मी त्यांच्यासोबत फिरत होतो. त्यांचे बोर टॉपिकस मी इंटरेस्ट असल्यासारखे ऐकत होतो पण एका मुलीचं नाव शोधता येत नव्हतं. ही नावाला एवढं ताप देतेय पटायला किती देईल असं वाटत होतं ..........

पुन्हा मधल्या सुट्टीत मी डोंबकावळ्या सोबत तिची वाटत बघत थांबलो होतो. शेवटी फास्टच का होईना बुलेट ट्रेन लांबून येतानाच दीपकला दाखवली दीपक जोर जोरात हसू लागला

*दीपक : तू तिच्या कुठे लागतो कंबरेला कि खांद्याला*

परत दोघे डोंबकावळे बत्तीशी काढून हसू लागले. मला खरचं आज त्यांच्या नरडीचा घुट घेऊ वाटत होता

*मी : एवढं पण नाही मी कानापर्यंत आहे*

*विश्वास : कानापर्यंत*

दोघेही पुन्हा बत्तीशी घेऊन हसू लागले

मी निघून क्लास मध्ये गेलो. दुपारनंतरचा वेळ हा खूप प्रिय असायचा. ती आणि माझे डोळे असा सुखद प्रवास तीन ते चार तासाचा परत कॉलेज सुटले ठरल्याप्रमाणे एक तास आकाश सोबत. आम्ही कॅन्टीन मध्ये बसलो होतो ठरल्याप्रमाणे आकाश आणि सुनीताचा बोर डिस्कशन मी ऐकत होतो

मी पुन्हा माझा टॉपिक काढला

*मी : हॉस्टेल चांगलं आहे का तुमचं*

*सुनीता : हो*

*आकाश : तू दहा, पंधरा दिवस झाले हॉस्टेल हॉस्टेल का विचारतोय?तुला गर्ल्स हॉस्टेलला ऍडमिशन घ्यायचंय का ??*

तशी ती सुनीता आणि आकाश माझा पोपट झाल्यासारखे हसले

मी म्हणालो “नाही रे, सहज ”

आज माझा दिवस बहुतेक चांगला असावा. ती कॅन्टीन च्या दरवाज्यातून आत आली. युनिफॉर्म वरच होती. तिच्याबरोबर मुली वेगळ्याच होत्या बहुतेक सिनियर असाव्यात. मी आज जाम खुश होतो

मी आकाश आणि सुनीताचा संभाषण मधेच तोडत विचारलं, “सुनीता, एकना एकना ”

सुनीता आणि आकाश नि काय झालं म्हणून माझ्याकडे पाहिलं

मी पुढे तिच्याकडे पाहत म्हणालो, " ती आमच्या डिव्हिजन मधली आहे, हॉस्टेलला राहती का ??

सुनीता तिकडे बघत म्हणाली, " कोणती, ती ब्लॅक सॅक वाली?"

मी फारच खुशीत होतो, " मी हा हा, तीच ब्लॅक सॅक वाली "

सुनीता हो म्हणाली

आकाशला बहुतेक माझं काय चाललंय ते कळलं असावं

*आकाश : का, तीच काय झालं ?*

*मी : काही नाही, ती आहे ना कलासमध्ये*

*आकाश : हो आहे, तर मग*

*मी : सहजच विचारलं*

परत ती दोघे त्यांच्या टॉपिकस वर डिस्कशन करू लागली, आता आर कि पार काय कळायचं ते कळू दे म्हणून मी परत सुनीताला प्रश्न केला, "काय नाव तीच "

*आकाश : कोणाचं ?*

आकाश साल्याला सगळं कळलं होतं तरी पण त्या सुनीता समोर माझ्याकडून काढून घेत होता.

पुढे तोच बोलला, " तीच नाव, स्मिता पाटील, हॉस्टेल लाच राहते. पुढे सुनीता कडे पाहत म्हणाला, " आणि सुनीता सीक्रेट हे आहे कि ती राजुला जाम आवडते. "मला काहीच सुचत नव्हतं पुढे काय बोलावं, माझी चोरी आकाश नि पकडली होती

सुनीता पुढे आश्चर्याने म्हणाली, " काय ? खरं का राजू ? " मी नाही असं काही नाही म्हणत होतो पण खरं हेच होतं आणि ते लपवलं तरी लपत नाही. आकाश पुढे बोलला, " आम्ही वेडे नाही का ? कळतं नाही का राजू आम्हाला, तू ब्रेक मध्ये पोर्च मध्ये का थांबतो ? कोणासाठी थांबतो. दुपार नंतरच्या लेक्चरला किती लक्ष देतो, कोणाकडे देतो, विश्वास क्लास मध्ये का आलता. कळतं रे भावा "

तशी सुनीता जोर जोरात हसायला लागली. सुनीता होय का होय का म्हणत माझ्याकडे बघत खूप हसत होती

*मी : नाही, हा कायपण सांगतो*

*आकाश : बरं, तू सांग काय खरं ते, मागचे १०, १५ दिवस तू आमच्याबरोबर फिरतोस, येऊन जाऊन एकच प्रश्न विचारतो, आमचा v मधल्या किती मुली आहेत हॉस्टेल ला. काय यार राजू*

*मी : जाऊदे ना, अक्क्या, तसं काही नाही, बसची वेळ झालीय, चल मी जातो बाय.*

तेवढ्यात सुनीता बोलली, " काय राजू, ओळख करून देऊ का "

*मी : खरचं तुम्ही समजतंय असं काही नाही*

जाता जाता तिझाकडे पुन्हा एकदा पाहिले आणि तिथून पळ काढलो.

फायनली नाव समजलं होतं स्मिता, कदाचित त्यामुळेच माझ्या चेहऱ्यावरचं स्मित हास्य काही केल्या जात नव्हतं. आज मला खिडकीतून येणारी हवाही प्रेमाची गुलाबी हवा वाटत होती. नकळत येणारी वाऱ्याची झुळूक, शरीराबरोबर मनालाही प्रस्सन करत होती. ओठावरच तीच नाव स्मिता आणि गालावरचे ते स्मित हास्य दोन्हीही काही केल्या जात नव्हतं

तेवढ्यात डोंबकावळा बोललाच

*विश्वास : काय नाव मग तीच*

*मी : कोणाचं ?*

*दीपक : जिच्यामुळे तुझ्या थोबाडावरच हसू जाईना तीच*

*मी : काय यार तू, विश्वास, सांग याला काही चांगलं बोलतच नाही, नेहमी आपलं वाकड*

*विश्वास : मेरे मेहबूब कयामत होगी*

*आज रुसवा 'तेरी गलियों मे मोहब्बत होगी*

*नाम निकलेगा तेरा ये लब से*

*जान जब ये दिले नादान से रुकसत होगी*

*मी : अरे वा, आज तुझं बोर गाणं पण चांगलं वाटायलंय*

विश्वास माझ्याकडे बघून खूपच हसत होता, जस लग्न जमल्यानंतर मित्र हसतात तशे

*विश्वास : मग काय नाव*

मी हसत हसतच बोललो, " स्मिता "

*विश्वास : हाय हाय, काय लाजतोय काय लाजतोय*

*मी : गप्प रे, मी हसतोय फक्त*

दीपकला दुधात विरजण घातल्याशिवाय चैन नव्हती पडत

*दीपक : स्मिता च्या पुढे काय*

*विश्वास : आता राजू पुढे तिला प्रपोझ करणार अजून काय*

*दीपक : तीच सरनेम काय विचारतोय*

*मी : काय करायचं तुला सरनेमच नाव आहे बस कि*

*दीपक : ती तुझ्या कास्टची नसणार हे तर नक्की*

तेवढ्यात विश्वास बोलला "राजू, एक सांगू तू नाराज नको होऊ "

त्याचा सिरिअस मोड बघून मला प्रश्नच पडला आता हा काय बोलणार म्हणालो मी हम्म्म्म बोल एवढंच म्हणालो

*विश्वास : मला वाटतंय ती तुला भीक नाही घालायची*

विश्वास मी कितीही सिरीयस असेल तरी वात्रटपणा करायचाच

*मी : ते वेळ आल्यावर कळेलच*

*विश्वास : तोंड बघू तुझं*

*मी : गप्प रे बाबा*

*दीपक : राज्या, तू स्टडी कर, हे पाखरू काय तुला उडणार नाही*

*विश्वास : दिप्या तू मित्र कि दुश्मन, उडणार चार वर्ष राजू सोबत उडणार आणि नंतर कोना दुसऱ्या सोबत उडणार*

आणि दोघेही बत्तीशी घेऊन हसू लागले. माझा राग आता अनावर झाला होता

*मी : चार वर्ष फक्त उडवायच नाही मला त्या पाखराला, आयुष्यभर उडवायचंय आणि तिच्या सोबत उडायचंय, आयुष्यभर*

बहुतेक मी जरा जास्तच बोललो दोघांनी सात रस्ता येईपर्यंत तोंडच नाही उघडलं.

सात रस्त्याला आम्ही तिघे उतरलो. विश्वास उतरल्या उतरल्या तोंड दाबून जोर जोरात हसू लागला मी रागातच होतो.

*मी : आता काय झालं ?*

विश्वास अजून पण हसतच होता

*विश्वास : काही नाही, शुभमंगल सावधान*

दोघेही पुन्हा हसत होते. मला दोघांचा खूप राग आला होता. माझ्या फीलिंग्सच मजाक बनवत होते साले, मी रागाने पाऊले टाकत झपझप निघून आलो रूमवर आणि पांघरून घेऊन झोपलो

आकाश आणि सुनीताला तर सगळेच कळलं होतं. त्यामुळे तिच्याबद्दल काही विचारायचं असेल तर मी सुनीताला बिनधास्त विचारात होतो. कधी कधी अक्क्या साला पण दोन डोंबकावळ्या सारखा मजाक करायचा मग मी रागाने उठून जायचो. सुनीता सांगत होती कि ती फर्स्ट इयर च्या मुलींबरोबर जास्त नसती. सिनिअर मुलीच रूममेट आहेत तिझें. ती सिनिअर सोबतच फिरती. होस्टेलवर कोणाशी बोलत पण नाही. जास्त करून रूम च्या बाहेर दिसत नाही. दिसलीच तर कधी कधी टीव्ही पाहायला आल्यावर, तेवढंच... पुन्हा एकदा मला तिचा तो शांत अबोल चेहरा आठवला परत मी स्वप्नाच्या दुनियेत फिरत होतो. त्यावेळी तो चेहरा फार शांत आणि अबोल वाटलेला पण आत्ता शंभर टक्के सांगू शकतो, तो चेहरा फक्त शांत दिसतो पण तो शांत कधी नव्हताच. ती तिच्या शब्दांच्या जाळ्यात कुठे आणि कधी

अडकवले हे समोरच्यालाही कळत नसे. ती फर्स्ट इयर च्या कोणासोबत बोलत नाही हे मला फार खटकायचं... तिच्यापर्यंत पोहोचायचा मार्गच नव्हता तरीही मी आस सोडत नव्हतो. डोंबकावळ्याच तर रोज एकच वाक्य असायचं, " छोड यार तुझसे नही होगा "

फर्स्ट युनिट टेस्ट जवळ आली होती. मी ठरवलेलं ह्या टेस्टला फर्स्ट यायचं. तिच्यावर इम्प्रेशन पाडायचं. थोडे दिवस तिचा विचार कमी आणि अभ्यासाचा विचार जास्त करायचा. पण वेगळीच होती ती काही केल्या मनातून जायचीचं नाही. दर पाच मिनिटाला फिरून मनात आलेली असायची, अभ्यास करणं पण अवघड जात होतं आता. बहुतेक मी तिचा जास्त विचार करायला लागलोय असं वाटत होतं म्हणून मी टेस्ट च्या आधी दोन दिवस कॉलेजला जायचं नाही, रूमवर बसून अभ्यास करायचा ठरवलं. तसंही टेस्ट च्या आदल्या दिवशी पंधरा ऑगस्ट होता मी गेलोच नाही पंधरा ऑगस्ट च्या कार्यक्रमाला. डोंबकावळे गेलते त्यांची राष्ट्रभक्ती जरा जास्तच होती. दुपारी एक वाजता मी नुकतंच जेवण करून थोडं झोपायच्या नादावर होतो तेवढ्यात डोंबकावळे आले.

विश्वास पुन्हा त्याचे बकवास गाणी बरळत होता

*विश्वास : तेरे चेहरे से, तेरे चेहरे से*

*नजर नही हटती*

*नजारे हम क्या देखे*

*मी दीपकला म्हणालो, " नक्की काय झालाय ह्याला "*

*दीपक, " राजू तू टेस्ट च्या नादात खूप काही मिस केलंस*

*मी : काय मिस केलं*

*विश्वास : सगळ्या होस्टेलच्या मुली आलेल्या कार्यक्रमाला, तुझी वाली पांढरा ड्रेस घालून आलती, काय भारी दिसत होती यार*

*मी : विश्वास, तू तुझ्या लिमिट मध्ये रहा*

*विश्वास : काय यार राजू तू, तुला चेष्टा पण कळत नाही. खरचं आली होती रे बाबा ती, तुझ्यासाठीच सांगतोय, खूप मुलांचा डोळा आहे काहीतरी कर नाहीतर मछली कब हात से फिसल जायेगी, कळायचं पण नाही*

मला राग पण येत होता मी गेलो नाही याचा आणि वाईट पण वाटत होतं, माझाच मालकी हक्क असल्यासारखा, मला कुणी तिला त्या नजरेनं पाहिलेलं, तिच्याबद्दल काही बोललेलं पटतच नव्हतं. खूप चिडचिड होतं होती. सगळ्यांना ओरडून सांगावं वाटत होतं. ती माझी आहे, माझ्या अगोदर मनात भरलीय...

टेस्ट मध्ये काहीपण करून टॉप करायचं हे मी पक्क ठरवलेलं. मन लावून अभ्यास चालू होता माझा. मधूनच ती माझ्या मनाच्या कप्प्यात डोकावू पाहायची पण ठरवलं होतं टेस्ट होईपर्यंत मनातच ठेवायची डोक्यात अजिबात शिरू द्यायची नाही. डोंबकावळ्यांना काही मोटिव्हच नव्हता, उगीच झोपून काय वाचायचे, पेंगत पेंगत काय वाचायचे मधेच झक मरूदे म्हणून पांघरून घेऊन काय झोपायचे. शेवटी टेस्ट चा दिवस उजाडला. आज मी तिची वाट पाहत बाहेर अजिबात थांबलो नव्हतो. सर क्लास वर येईपपार्यंत अभ्यासच करत बसलो होतो. अधून मधून डोकावून पाहायचो तिच्याकडे ति पण पेपर लिहीत असायची. हुशार आहे असं वाटत होतं. देवाला मनोमन प्रार्थना करत होतो ही आली तरी दुसरी यावी देवा पहिला मीच यावा जेणेकरून पहिला कोण म्हणून ति मला ओळखेल. शेवटी सगळे पेपर संपले आणि एका आठवड्याच्या आत रिझल्ट नोटीस बोर्डला डिस्प्ले झाला. देवाने माझं एकल होतं मी पहिलाच होतो पण ति ना दुसरी होती, ना तिसरी, ना चौथी ना पाचवी, मी तिचा रिझल्ट पाहिला ति दोन सब्जेक्ट मध्ये फेल झाली होती. मी मनोमन देवाला म्हणत होतो, " काय देवा तुला पहिली नको म्हणलेले तू डायरेक्ट तिला फेलच केलंस. "

शाळेत असायचं तसं टॉपर्स ना उठवून टाळ्या वाजवायच्या असलं काही नव्हतं इथं. मी टॉपर येऊनही तिला अजून माहितीच नव्हतो. मला असं वाटत मी पंतप्रधान जरी झालो तरी तिला माहितीच होणार नव्हतो कि काय. एखाद्याला आपण एवढं फॉलो करतोय पण समोरच्याच्या लक्षातच येत नाही अशीही पहिली मुलगी होती. क्लास मध्ये पण ति कोणाशी जास्त बोलत नव्हती. क्लास मधल्या इतर मुली आता मला चांगल्या ओळखू लागल्या होत्या. असाइनमेंट नोटबुक, प्रॅक्टिकल मॅन्युअल आम्ही शेअर करायचो. पण ही माझ्याबरोबर सोडा क्लास मधल्या इतर हुशार मुलींबरोबर पण जास्त बोलत नव्हती. विश्वास बोलल्याप्रमाणे माझं इंजिन आता खरंच खराब होणार होतं असं वाटत होतं.

तिच्याबरोबर बेंचवर बसायची तिही मुलगी शांतच होती. होस्टेलची तर नव्हतीच पण बस मध्ये पण नव्हती त्यामुळे स्मिता पर्यंत पोहोचणे आणखीनच कठीण. हे स्मिता नावाचं कोड मला काही केल्या सुटत नव्हतं. कॉलेज सुटल्यावर मला सगळ्या मित्रमैत्रिनींनी टॉपर आल्याची पार्टी मागितली. मी लगेच तयार झालो कुठेतरी आशेचा किरण होता ति येईल म्हणून पण नेहमीप्रमाणे ति नव्हतीच आमच्यात. मी सगळ्यांना त्यांच्या आवडीनुसार ऑर्डर करायला सांगितलं तेवढ्यात ति आली सिनिअर्स सोबत. आज सिनिअर मुलींसोबत दोन सिनिअर मुलं पण होती. ह्या सिनिअर मुलांचा जुनिअर मुलींवर फार डोळा असायचा. मला फक्त एवढाच वाटायचं हिला कोणी प्रोपोझ करू नये आणि ही कोणाला पटू नये. सगळ्या क्लास चा गोंधळ चेष्टा मस्करी चाललेली माझं मात्र सगळं लक्ष तिच्याकडेच होतं. इथेही ति सिनिअर मुलं मुलीचं बोलत होती, ही शांतच होती, मधेच तो सिनिअर मुलगा तिला काहीतरी प्रश्न विचारायचा बहुतेक फर्स्ट इयर का ? कुठली ब्रॅन्च? गाव कुठलं ?? वगैरे वगैरे. मला मनातल्या मनात साल्यांचा राग येत होता. इतके दिवस मी तिचा मागे आहे आमचं साधं बोलणं पण नाही झालं आणि ह्यांचं बरंय सिनिअर च्या नावावर जोरा. आत्ता मैत्री करण एकदम सोप्प झालंय, फ्रेंड रिक्वेस्ट पाठवायची कि झाली मैत्री आणि झालं चाटटींग सुरु. पण आमच्यावेळी व्हाट्सअँप, फेसबुक हा तर प्रकारचं नव्हता. आत्तासारखा, स्मार्टफोन फार कमी पाहायला भेटायचे ते पण गाणी ऐकायला आणि फोटो काढायला बाकी जास्त नाही. माझी दररोजची दिनचर्या आता ठरलेली होती. सकाळ दुपार तिची वाट पाहत कॅन्टीनला तर कधी क्लास च्या पुढे, संध्याकाळी कॅन्टीन मध्ये. जवळ जवळ क्लास मधली सगळी मुलं मुली ओळखत होती मला स्कॉलर सिन्सिअर म्हणून पण अजूनही चार पाच न ओळखणाऱ्या मुली होत्या त्यात ति होती.

मला स्मिता हे कोड म्हणजे ते असायचं ना लहानपणी बी रमेश च्या वह्यांचा पाठीमागे मार्ग शोधा म्हणून तसं वाटत होतं सगळे मार्ग चुकीचे ठरत होते. मी दिवसेंदिवस तिचा जास्तच विचार करू लागलो होतो. माझ्या ओळखीच्या सगळ्याच मित्रमैत्रिनींना मी तिच्यावर indirectly मरतो हे माहिती झालं होतं. जे आहे ते आहे लपून छपून जगाला खोटं सांगून अशातला मी नव्हतो, मी म्हणजे पूर्ण सत्यवादी. तिच्याशी मैत्री तर लांबच पण एक सेमिस्टर संपत आली तरी साधी ओळख नव्हती आमची. तिचा पुढे जाऊन उभा राहिलो तरी कोण तू हेच विचारणार ति हे माहिती होतं मला. प्रॅक्टिकल batches पण आमच्या वेगळ्या होत्या. आकाश पण नव्हता तिच्या batch मध्ये त्यामुळे काही कळायला मार्गच नव्हता. कॉलेज मध्ये एके दिवशी dept wise प्रोजेक्ट exhibition होतं. आम्हाला दुपारून exhibition पाहायला

सोडणार होते. त्या दिवशी तर ति अगदी मला पाहिजे तशी पांढरा शुभ्र सलवार कमीज घालून आली होती. पंजाबी ड्रेस मध्ये मुली सुंदर दिसतात हे काय खोटं नव्हतं ति खरंच सुंदर दिसत होती, त्यात तिने केस मोकळे सोडलेले. मला ति आज साऊथ moviesची हिरोईनच वाटत होती. तीच गोलाकार फेसिन्ग आणि त्यावर चष्मा. मला ति जेनेलिया, सानिया मिर्झा सगळ्यांचीच झलक वाटत होती तिच्या शरीर बांधणीमुळे आणि पर्सनॅलिटी मुळे कोणीही तिच्याकडे attract होईल अशी वाटत होती पण आज मला पहिल्यांदाच तिचा खूप राग आला होता. ति तिच्या क्लास मधल्या xyz friend सोबत प्रोजेक्ट exhibition पाहायला आली. तिला सिनिअर मुलींपैकी एकीने आवाज दिला ति त्यांच्या ग्रुप चा प्रोजेक्ट पाहण्यासाठी गेली त्यात सिनिअर मुलं पण होती आम्ही इलेक्ट्रिकल dept चे प्रोजेक्ट पाहायला आलेलो त्यामुळे मला कळलं ही सगळी मुलं इलेक्ट्रिकल dept ची. कधी क्लास मध्ये तोंडातून ब्र न काढणारी आज त्या मुलांना हजारो प्रश्न विचारात होती आणि त्या मुलाला काय हवं होतं तेच कि. तो सातव्या असमानावर असल्याचा फील घेत असणार हे त्याच्याकडे बघूनच कळतं होतं. कितीतरी स्माईल देऊन देऊन तो तिच्या हजारो प्रश्नांची उत्तर देत होता. ह्या सिनिअर चा रस नेहमी जुनिअर मधेच का असतो ? कलासमेंट पुरेशा नसतात का त्यांना ?? मला तिचा अतिशय राग आलेला कारणं ति त्या मुलाला हजारो प्रश्न विचारात होती आणि तेच पाहिजे होतं त्या मुलाला पण. राग येण्यासारखं काहीच नव्हतं पण मी पूर्ण जळत होतो केसापासून नखापर्यंत. ति म्हणजे माझाच सातबारा असल्यासारखी होती. जिच्यावर नाव फक्त माझाच असावं. मी तिथून निघून गेलो माझं लक्ष कशातच लागत नव्हतं मी एकटाच मागच्या जिन्यावर डोळ्यात पाणी घेऊन बसलो होतो माझ्या चष्म्यामुळे कदाचित ते कोणाला दिसत नसेल पण तो चष्माच मला प्रिय होता कारणं तिच्यात आणि माझ्यात एकाच गोष्ट साम्य होती ते म्हणजे चष्मा...

आज मी कॅन्टीन मध्ये पण नाही गेलो कारणं परत ति त्या सिनिअर सोबत दिसली असती तर कदाचित मी माझा चष्माच फोडलो असतो म्हणजे मला ति धूसरच दिसली असती...

संध्याकाळी माझं लक्ष रूमवर पण कसलंच लागत नव्हतं. दीपक आणि विश्वास चा मूवी पाहायला जायचा प्लॅन होता कारण दुसऱ्या दिवशी संडे होता. मी पण माझा मूड बदलण्यासाठी मूवीला जायचं ठरवलं. बॉडीगार्ड मूवी होता. सलमान खान माझा लहानपणापासूनच आवडता होता. मी स्वतःला सलमान खानचं समजायचो. तसं मी फक्त हाईट मध्ये थोडा मार खाल्ला होता नाहीतर दिसायला तर मी चांगलाच होतो. माझे बालपणाचे मित्र अजूनही मला सलमान म्हणूनच चिडवायचे. धारधार नाक, उजळ कलर, केस तर माझे अगदी सलमानसारखेच, त्याच्यासारखी बॉडी बनवली कि झालं. कधी कधी मी स्वतःला

सलमान आणि तिला कतरीना समजायचो. विश्वास नि दोनच तिकीट काढलेली आम्ही जाऊन ऐनवेळी तिसरं तिकीट काढलं. गर्दी जाम असल्यामुळे मला एकट्यालाच वेगळीकडे बसावं लागलं. ९ ते १२ कधी वेळ गेला कळलंच नाही. मुवि सलमान चा असल्यामुळे ठीक वाटलं पण स्टोरी मात्र बकवास होती. शेवटी सलमान ह्यातच समाधान. त्या करीना कपूर मध्ये पण मी तिलाच शोधत होतो. आम्ही येताना बरीच रात्र झाली होती. ऑटो करून सात रस्त्याला उतरलो. आणि तिथून चालत रूमकडे निघालो. सात रस्त्यावर कुत्र्यांचा रात्री अड्डाच असायचा. एकचं शांतता आणि कुत्र्याचा भूंकण्याचा आवाज एवढंच कानावर पडत होतं, तेवढ्यात विश्वास म्हणाला, " राजू मुवि कसा वाटलं "

*मी : ठीक होता*

*दीपक : काय घंटा ठीक. मला आवडलाच नाही फुकट पैसा वेस्ट*

*विश्वास : तसा बरा होता गाणी छान होती*

*मी : हम्मम्म*

*विश्वास : तू तिलाच इमॅजिन करत असेल नाही मुवि संपेपर्यंत*

*दीपक : काय यार राजू, एक सेमिस्टर संपत आली. साधं तुझं अस्तित्व तिला माहिती नाही. साधं बोलणं नाही तुमचं*

*विश्वास : कसला घाबरट रे राज्या तू*

*मी : घाबरट आणि मी, कशावरून, बोलत नाही म्हणून, घाबरलो असतो तर निम्म्यापेक्षा जास्त पोरांना माहिती नसतं मी तिला लाईक करतो ते*

*दीपक : असं कोणाला माहिती आहे आम्ही दोन चार जण सोडलो तर. सगळ्या कॉलेजला माहिती असल्यासारखं बोलायला लागलाय*

*विश्वास : सगळ्यांना जर का माहिती असतं तर तिच्यापर्यंत पोहोचलंच असत. एक मोठी स्लीपर घेऊन आली असती राजूसाठी*

विश्वास आणि दीपक दोघेही मोठं मोठ्याने हसू लागले. माझा आज त्यांच्यावर रागवण्याचा ओरडण्याचा कसलाच मूड नव्हता

*मी : मला तर खरचं सगळ्या कॉलेजला ओरडून ओरडून सांगू वाटतंय*

*विश्वास : बघू तुझी हिम्मत इथे ओरड आत्ता सात रस्त्याला*

*मी : डोकं फिरलंय का तुझं ?*

*दीपक : तो कसला घाबरट विश्वास, तो आणि इथे ओरडणं शक्यच नाही*

मला माहिती होतं ह्या दोघांना नेहमी फक्त माझा पोपट झालेला पाहायचा असतो. मला काहीतरी करून रागाला घालवायचं, ओरडायला लावायचं आणि चार चौघात माझी इज्जत काढायची एवढंच

*मी : माझं तिच्यावर प्रेम आहे तेही खरं प्रेम आहे आणि कायम असणार तिला कळों अथवा ना कळों. त्यासाठी ओरडायची गरज नाही*

मला खूप राग आला होता आणि मी रागाने झपाझप पाऊले टाकत चालत होतो

विश्वास मागून ओरडू लागला, " ये थांब, कशाला मग थोबाड वर करून सगळ्यांना सांगू वाटतंय म्हणत होतास ". माझं लक्षच नव्हतं त्याच्याकडे मी फक्त चालत होतो...

दुसऱ्या दिवशी रविवार होता. रविवार म्हणजे उशिरा उठायचं. उशिरा म्हणजे डायरेक्ट उठून अंघोळ करून १२. ३० चा टिफ़ीनच खायचा. टिफिनला संडे स्पेसिअल ठरलेलं असायचं. जेवणकरे पर्यंत १. ३०, २ वाजायचे. आज जेवण पण एक घास ३२ वेळा चावून खालल्यासारखं असायचं. तिथून पुढे गप्पा आणि परत झोप. झोपेतून उठून संध्याकाळी फेरफटका आणि टिफिनला सुट्टी असल्यामुळे बाहेरूनच काहीतरी खाऊन यायचं हे ठरलेलं. आज पार्कला जाऊन संध्याकाळी चायनीज खायचं आमचं ठरलेलं. सिटी पार्क म्हणजे इथली चौपाटीचं होती, मोठं मोठे चायनीज, बिर्याणी, पावभाजी, पाणीपुरी, कच्ची दाबेली, चिकन तंदूर आणि

आईस्क्रीम फालुद्याचे स्टॉल. रविवारी तिथे भयंकर गर्दी असायची. कॉलेज स्टुडंट्स साठी जणू ताज हॉटेलचं. नेहमीप्रमाणे आम्ही फेरफटका मारत निघालो. थोड्याच वेळात आम्ही पार्कवर जाणार होतो, होस्टेलवरून आकाश आणि अक्षय हे दोघेपण येणार होते आज पार्कवर. आम्ही सातच्या सुमारास पार्कवर पोहोचलॊ. आकाश आणि अक्षय अगोदरच येऊन बसले होते. आम्ही तिथे पोहोचलो तर आकाश माझ्याकडे बघून मोकळ्यात हसू लागला. मला कळतच नव्हतं हा असा का हसतोय. शेवटी मी न राहवून विचारलं.

*मी : काय मग आकाश आज काय विशेष सुनिताचं*

आकाश माझ्या ह्या वाक्यावार जाम चिडला

*आकाश : आम्ही दोघे फक्त मित्र आहोत*

*मी : मी कुठे काय म्हणालो*

*आकाश : तुझं बघ, आत्ता नवी पेठेत स्मिता दिसली*

*मी : आज तरी नको यार तो विषय, उगी चेष्टा नका करू*

*आकाश : खरंच, अक्षयला विचार*

*अक्षय : हो दिसली नवी पेठेत, एका मुलाबरोबर*

*विश्वास : अबबबबबब... दिल के अरमा आसू वोमे बेह गये... हम वफा करके भी तनहा रेह गये*

*मी : खेचा अजून खेचा माझी*

*आकाश : तुला खोटं वाटतंय, चल माझ्यासोबत*

*मी : गपा रे, भूक लागलीय, ये दीपक ऑर्डर दे, अगोदरच डोक्याचं दही झालंय*

*विश्वास : मी काय म्हणतो राजू, एकदा कन्फर्म करूयात का, येउयात का नव्या पेठेत बघून*

*आकाश : बघा बघा आम्ही काय खोटं बोलतो का*

*मी : असली तर असली, मला नाही फरक पडत*

*विश्वास : खरंच नाही पडत ??*

*मी : तुम्हाला बघायचंय तुम्ही जावा, मला खायचंय*

कळतच नव्हतं मला हे साले खरं बोलत होते का खोटं. ती नसणारच असं एक मन सांगत होतं. परत राहून राहून कालचा प्रसंग आठवत होता, त्या सिनिअर मुलासोबत तर नसेल ना आली. त्या दोघांचं काही चालू झालं नसेल ना, लाखो विचार डोक्यात येऊन डोकं फुटायची वेळ आली होती. माझ्या लव्हस्टोरीला इथेच ब्रेक लागला असं वाटत होतं... मला बहुतेक जेवण पण जाणार नव्हतं. टेन्शन नि माझ्या पोटात कालवायला लागलं होतं. मला काहीच सुचत नव्हत. तरीही मी शांत असल्याचा भास सगळ्यांना करून देत होतो

मी कसं बस्स ते चायनीज माझ्या घश्या खाली उतरवलो. मला कधी एकदा तिथून उठून एकांतात जाऊ असं वाटत होतं. म्हणून मी सगळ्यांना सांगितलं तुम्ही तुमचं संपवा मी सगळ्यांसाठी समोरच्या गाड्यावरच आईस्क्रीम घेऊन येतो आणि मी तिथून उठलो. मी आईस्क्रीमची ऑर्डर दिली आणि तिथेच वाट पाहत थांबलो तेवढ्यात मला बाजूच्या पावभाजी स्टॉल वर स्मिता सारखी एक मुलगी दिसली मी माझे डोळे चोळले, मला भास तर होतं नाही ना म्हणून मी दोनदा डोळे बंद करून ऊघडलो पण ती स्मिताच होती तिच्याबरोबर दोन सिनिअर मुली होत्या. ती त्यांच्याबरोबर पावभाजी खात होती. आकाश आणि अक्षय बोलले ते खरं होतं पण ती मुलाबरोबर नाही तर सिनिअर मुलींबरोबर आली होती. माझा आनंद गगनात मावत नव्हता कारण एक तर ती कोण मुलाबरोबर आली नव्हती आणि दुसरी गोष्ट ती अशी अचानक कॉलेज सोडून कुठे तरी बाहेर पहिल्यांदाच मला दिसली होती. आज तिने पंजाबी ड्रेस घातला होता, अगदी माझी तिला बघण्याची इच्छा होती ती अगदी तशी दिसत होती. पंजाबी ड्रेस मध्ये खरंच ती खूप गोड दिसायची. मी तिला पाहण्यात व्यस्त होतो तेवढ्यात आईस्क्रीमची ऑर्डर आली. मी आईस्क्रीम पटकन विश्वास च्या हातात देऊन आलोच पाच मिनिटात म्हणत तो काय म्हणायच्या आधीच तेथून पळ काढला.

विश्वास मागून ओरडत होता, " अरे तुझं आईस्क्रीम वितळेल "

मी ओरडतच म्हणालो, " तू खाऊन घे माझं पण "

मी स्मिताच्या बाजूच्या टेबलवर जाऊन बसलो. मला त्यांच्यातलं कोणच ओळखत नव्हतं ती पण नाही. पावभाजीवाला दोन वेळा येऊन विचारून गेला, “बोलो भाई क्या दु ”

*मी : वो दोस्त के लिये रुका हू, पाच मिनिट*

मी नक्की हिंदी व्यवस्थित बोललो होतो कि नाही देव जाणे पण तो तिथून गेला म्हणजे त्याला कळालं बाकी काय का असेना

त्या तिघी जणी होत्या. त्यांच्याकडे बरंच सामान होतं म्हणजे त्या नवी पेठेत जाऊन शॉपिंग करून आल्या असणार हे नक्की तिथेच आकाश साल्याने त्यांना पाहिलं आणि येऊन माझी खेचली. पण ते काय का असेना माझं नशीब आज जोरावर आहे असच वाटत होतं. मी मनातल्या मनात म्हणत होतो, " धन्य तो आमचा मेसवाला जो रविवारी संध्याकाळी टिफिन देत नाही, धन्य त्या मुली ज्यांनी स्मिताला इथे आणलं आणि धन्य तो विश्वास ज्याला पार्कवर जाऊन चायनीज खायची बुद्धी सुचली आणि धन्य तो मी जो आईस्क्रीम आणायला बाहेर आलो "

दहा मिनिट झाले तरी मी काहीच ऑर्डर केलं नव्हतं तो भैय्या पुन्हा आला “क्या हुआ, आप कुछ मंगवायेंगे या नही”

*मी : बस और पाच मिनिट*

तेवढ्यात मला स्मिता आणि तिच्या मैत्रिणींनी फालुदा ऑर्डर मागवलेला दिसला

*मी : फालुदा, फालुदा लावो एक*

*भैय्या : ये पावभाजी का स्टॉल हे फालुदा बाजू मी हे, पेहले पावभाजी लेता है क्या बोलो फिर फालुदा लाता हे*

मला कळलं होतं आता तो माझ्यावर जाम चिडला होता

*मी : ठीक हे मै खुद्द लेके आता हू*

*भैय्या : आप उठिये यहा से, कस्टमर वेट कर रहा हे, खाली मी टाईमपास किया*

मी गुपचूप उठून फालुद्याच्या स्टॉलवर गेलो तिथून ती स्पष्ट दिसत होती. फालुदा खात खात माझ्या चष्म्यातील नजर तिलाच पाहत होती. काजू, बदाम, गुलकंद आणि चेरी असा फालुद्याचा सिप घेतला कि तिचे ओठ आठवायचे, आईस्क्रीम सोबत शेवयाची थंड सिप घेतला कि तिचे गाल आठवायचे. तेवढ्यात लक्षात आलं कि तिने आज चष्माच घातला नव्हता. मला ती चष्म्यातच छान वाटायची पण आता पण काही कमी नव्हती. तेवढ्यात समोर पाहिलं तर सगळे डोंबकावळे रागाने नजर रोखून माझ्याकडे पाहत होती. जवळ येऊन विश्वास बोललाच "क्या राजू क्या चल रहा हे"

*मी : काही नाही फालुदा खातोय*

*दीपक : आम्हाला आईस्क्रीम खायला लावलं आणि तू फालुदा खातोयेस*

*विश्वास : सिचवेशन को समझ दीपक*

(विश्वासाचे परत रंग बहार गीत चालू झाले, "मेरे सामने वाले स्टॉल पे कोई फालुदा खाता हे"

*आकाश : आम्ही म्हणत होतो ना ती दिसली, विश्वास नाही ना मित्रावर*

*मी : आणि ती कोणासोबत आलीय*

त्यावर सगळे जोरजोरात हसू लागले

*विश्वास : काय पण म्हण राज्या, ती कोणा मुलासोबत आलीय म्हणल्यावर तुझं तोंड बघण्यासारखं झालत*

परत सगळे हसू लागले

*मी : ये सोड, मला माहिती होतं ती असं कोणासोबत नाही येणार*

*आकाश : बबो, कसला विश्वास*

तेवढ्यात त्या बिल देऊन जाऊ लागल्या

*अक्षय : चला रे उशीर झालाय आम्ही दोघे पण निघतो आता*

*मी : कुठे*

*आकाश : होस्टेलवर*

*मी : थांब मी पण येतो*

*विश्वास : तू हॉस्टेलला जाणार का ??*

*मी : हो, उद्या येताना माझी सॅक आणि टिफिन तेवढा घेऊन ये*

*दीपक : आम्ही तुझे नौकर नाही का*

*विश्वास : फिकर ना कर तू राजू, जा भावा* जा, जिले अपनी जिंदगी

दीपक जाम चिडला होता

*दीपक : त्याच सामान आपण का वागवायचं*

*विश्वास : दिप्या, फक्त सामान तर वागवायचंय यार, सांग राजू अजून काय काय आणू*

*मी : काही नाही, चल मी जातो*

आम्ही तिघे ऑटो नि भैय्या चौकात पोहोचलो. त्या तिघी ऑलरेडी वडाप मध्ये जाऊन बसलेल्या. जवळ जवळ पूर्ण वडाप फुल होती कशीबशी ड्राइवर शेजारी एक जागा होती

*आकाश : जा भावा तुला जास्त गरज आहे*

मी ड्राइवर शेजारी काय पण शत्रू शेजारीपण बसायला तयार झालो असतो. वडाप मध्ये ड्राइवर शेजारी नेहमी जेन्टस बसतात आज चक्क त्याच्या शेजारी साडी घातलेली आणि बराच मेकअप केलेली बाई होती. तिला नीट पाहिल्यावर मी जाम घाबरलो. कारण मी असा अनुभव याच्या आधी कधीच घेतला नव्हता. त्यांना लांबूनच पाहिलेलं पण आता त्यांच्याबरोबर बसायची वेळ आली होती. जाताना दोन टोळ नाके होते. ती नाक्यावर बसलेल्या कोणत्याही पुरुषाकडे बघून, " ये चिकणे" असं म्हणून बोटं तोडायची. मला कुठून बुद्धी सुचली आणि मी इथे बसलो असं वाटत होतं पण परत वाटलं तो पण एक माणूस आहे आणि त्यांचंही समाजात स्थान आहे, एवढं रिऍक्ट होता कामा नये. माझं नशीब ती मला चिकणे वगैरे असं काही म्हणाली नव्हती. मधूनच मी आरशात पाहायचो. आरशात मला स्मिता स्पष्ट दिसत होती. थोडं पुढे गेल्यावर ती तिच्या मैत्रिणींच्या खांद्यावर डोकं ठेऊन झोपली होती. झोपताना पण ती किती गोड दिसत होती. डोळे मिटलेला चेहरा हा खरंच खूप बोलका असतो. चेहऱ्यावरचा प्रत्येक भाव जणू कितीतरी गोष्टी सांगत आहे असच भासतो. तिच्या मैत्रिणीनी तिला अगदी लहान बहिणीसारखं ट्रीट करत होत्या. थोडं पुढे गेल्यावर एकीने हळूच तिच्या मांडीवरची सॅक स्वतःजवळ घेतली. माझ्या मनात जी सिनिअर बद्दलची चीड, राग आणि भीती होती ती क्षणात पळून गेली आणि त्यांच्याविषयी आदर वाटू लागला. गाडी कॉलेज च्या गेट जवळ येऊन थांबली. त्यांच्यातल्या एकीने पैसे देऊन पटकन तिघी निघून गेल्या. मी त्या हॉस्टेलच्या स्टेपपर्यंत जाईपर्यंत त्यांच्या पाठमोऱ्या आकृतीकडे पाहत होतो. आकाश आणि अक्षयची वाट पाहत मी बराच वेळ तिथेच थांबलो होतो... रात्री मी बराच उशीर विचार करत होतो फक्त आणि फक्त तिचा...

सकाळी लवकर जागचं आली नाही. कसबसं मी घाई गडबडीत आवरून आकाश सोबत नाष्टा करायला गेलो. तेवढ्यात डोंबकावळे माझी सॅक आणि टिफिन घेऊन हजर होते

विश्वासच आल्या आल्या चालू झालं

*विश्वास : बोलणं वगैरे झालं कि नाही मग काल*

*मी : बोलणं वगैरे, एवढ्या लवकर शक्य नाही असं वाटतंय*

*विश्वास : लवकर कुठे बाळा, दोन महिन्यांनी पहिली सेम संपेल*

*दीपक : बहुतेक तो लास्ट इयरला बोलणार आहे जाताना*

माझं त्यांच्याकडे लक्षच नव्हतं. मी आकाश बरोबर क्लास मध्ये गेलो. दिवस भर भर निघून जात होते. युनिट टेस्ट सेकंड पण झाली. ठरल्याप्रमाणे त्यातही मीच टॉपर होतो. नेहमीप्रमाणे मी तिचा रिझल्ट पहिला तिचा एक सब्जेक्ट बॅक होता. चला प्रोग्रेस आहे प्रेलिमिनरीला ऑल क्लिअर होईल असं वाटत होतं. प्रॅक्टिकल च्या बॅचेस मध्ये पण ती माझ्या बॅच मध्ये नव्हती. प्रॅक्टिकल बॅच मध्ये नसली तरी हरकत नाही पण माझ्या नशिबात तरी असावी, राहून राहून एवढंच मनाला वाटत होतं. फर्स्ट इयरला कुठल्याच सब्जेक्टला एक्सटेर्नल ओरल नव्हती तरीपण प्रॅक्टिकल परफॉर्म करायचेच होते, रिडींग घ्यायचेच होते. मॅन्युअल लिहायचेच होते. बघता बघता प्रीलियम जवळ आली होती. सगळ्या विषयांचं सबमिशन आटोपलं होतं. ग्राफिक्स चे शीट पण चेक करून सबमिट झाले होते. ग्राफिक्स हा सब्जेक्ट मला इतर विषियापेक्षा जरा हार्ड वाटायचं. माझं ड्रायविंग तितकं चांगलं नव्हतं तरीही मी आयसो ऑर्थो सरांनी क्लास मध्ये स्तुती करावी इतपत चांगले काढले होते. सरांनी संपूर्ण क्लास मध्ये छान प्रेझेंटिन्ग स्किल म्हणून दोनदा नाव घेतलं होतं. तरीही ह्या वेडाबयाला मी कोण हे माहिती नसणार किंव्हा माहिती करायचा प्रयत्नही केला नसणार हे नक्की. प्रीलियम च्या आधी आम्हा सगळ्यांना वर्कशॉप चा जॉब सबमिट करायचा होता, जॉब म्हणजे एक लोखंडी तुकडा त्याला मेकॅनिकल वर्कशॉप मध्ये ऍप्रॉन घालून मेकॅनिकल मशीनरी च्या साह्याने तासून तासून एक टणक पट्टी बनवायची. घाम येईपर्यंत आम्ही तो तासला होता. जेव्हा मी माझ्या इतर बॅचमेण्ट सोबत जॉब सबमिट करायला वर्कशॉप मध्ये गेलो तेव्हा स्मिता पण तिथे होती. ती अत्यंत केविलवाण्या स्वरात सरांना सांगत होती, " मी हॉस्टेलला पण नाही घेऊन गेले जॉब, इथेही नाही, मी इथेच ठेवला होता, कोणीतरी घेतलाय माझा जॉब "

सर तिला म्हणत होते, " तुमचं सगळं मान्य आहे पाटील, तुम्ही ठेवताना लक्ष द्यायचं ना, कोण घेऊन गेलं कसं कळणार आता , तुम्हाला परत एकदा तयार करून सबमिट करावा लागेल ".

ती बघते असं म्हणून रडवलेला चेहरा करून तिथून नीघून गेली. ती रडताना पण छान दिसत होती. अगदी cute. लहान बाळ एखाद्या गोष्टीवरून रडत रुसत अगदी तसं. मला बहुतेक ती हसताना रडताना रागवताना, सगळ्यातच छान वाटत होती. तिच्या चेहयात मी

इतका गुंतलेलो कि मला म्हणायचं होतं, "सर माझा जॉब घ्या, मी पुन्हा करतो " पण तेही म्हणायचं राहील.

आमच्या क्लास मध्ये आणखीन एक पाटील होता. रोहित पाटील. प्रॉपर चाच होता. थोडा उंडगा होता, दादागिरी, गुंडागर्दी असच असायचं त्याच. रोज कॉलेजला पण यायचा नाही. सरांचा ओरडा पण खायचा रोज. पण फार धार्मिक होता. गळ्यात माळ होती. रोज अष्टिगंध लावून यायचा. मुलींमध्ये तर काहीच रस नव्हता. पण अभ्यासात लक्ष मात्र नसायचं फक्त मस्ती एवढंच. तो आम्ही जॉब सबमिट करून येताना हसायला लागला आणि आम्हाला सांगू लागला, " काय बे, कसं हरवली हिने जॉब. मी तर कायच केलो नाय त्या जॉबचं. असंच थोडंस केलं अन झालं. ही आमच्याच बॅच मध्ये होती. लय तासून तासून, मन लावून करायची जसं काय हिरे मोतीच कोरतीय अन हिला अवॉर्डच मिळणार आता, बस्स म्हणावं आता बोंबलत "

सगळे मोठं मोठयाने हसू लागले

मीच पुढे बोललो, " असुदे रे असतात काही मुली सिन्सिअर, सगळे तुझ्यासारखे असावे का ".

तो बोलायला कोणाला झेपणार, पुढे बोललाच, " तू द्यायचा होता तुझा जॉब मग, लय पुळका यायलाय तिचा. परत सगळे हसू लागले. माझं नशीब चांगलं होतं माझ्यासोबत आकाश नव्हता नाहीतर आज जग जाहीर झालं असत

राजू स्मितावर मरतो...

प्रीलियम चा आज लास्ट चा पेपर होता केमिस्टरी चा. ह्या नंतर दिवाळीची सुट्टी होती आठ दिवस. त्या नंतर आठ दिवसांनी युनिव्हर्सिटी पेपर चालू होणार होते. दिवाळीच्या सुट्टीनंतर जेमतेम पंधरा दिवस मध्ये होते कि लगेच पेपर चालू. सिनिअर म्हणायचे पेपर च्या आधी नाईट मारली कि पेपर निघालाच म्हणून समजा. तो इंजिनिअर कसला जो नाईट नाही मारणार. मला ह्या सेमिस्टरला कसल्याही परिस्थितीत टॉपर यायचं होतं आणि सध्या तरी हे

एकच ध्येय होतं कारण जोपर्यंत मी युनिव्हर्सिटी एक्झाम मध्ये टॉप करत नाही तोपर्यंत स्मिता ह्या विषयाचा अभ्यास करूनही फायदा नाही एवढं समजलं होतं.

प्रीलियम पेपर झाल्यावर तिला डोळे भरून पाहायचं आणि पुढचा जवळ जवळ महिना भर हे डोळे तिच्यावरून हटवून फक्त अभ्यासात लावायचे हे मी पक्क ठरवलं होतं त्यामुळे पेपर कधी संपतो आणि कधी एकदा मी तिला स्कॅन करून मनाच्या कप्प्यात ठेऊन देतो असं झालं होतं. मी पेपर संपवून बाहेर आलो. माझी नजर तिलाच शोधात होती. जी शोधून सापडेल ती स्मिता काय. ती बुलेट ट्रेन होती. खरं होतं विश्वासचं. मी बाहेर यायच्या आधीच ती भुर्रकन उडाली होती. शेवटी राहीलच तिला डोळे भरून पाहायचं तेव्हाही राहील आणि आत्ताही नेहमी वाटायचं आज तिला डोळे भरून पाहावं ती पुन्हा नाही पण मी तिला कधी शेवटचं मन भरून पाहिलंच नाही कदाचित माझं मन कधी भरलंच नाही...

मी दिवाळीच्या सुट्टीला घरी आलो होतो. दिवाळी म्हणाल कि फराळ आला, फटाके आले, माझ्या सगळ्या बहिणी त्यांची लेकरं सगळी आली होती सुट्टीला. घर कसं गजबजल्या सारखं झालं होतं. आईचे रोज नवनवीन पदार्थ. सकाळ कधी व्हायची आणि संख्याकाळ कधी काही कळतंच नव्हतं. पण सगळ्यांना जाणवत होतं मी पहिल्यासारखा ह्या दिवाळीला उत्साहात नाहीये. वेगळ्याच विचारात आहे ते. कधी कधी आईला सगळं सांगू वाटायचं पण परत शांत बसायचो कारण तिच्या तोंडात एकच विषय असायचा चांगले मार्क्स पाहिजे, नोकरी पाहिजे. आत्ता जर मी हे तिला सांगितलं तर तिला वाटलं असत मी अभ्यास सोडून नसते धंदे करतोय. प्रेम वगैरे हे तिच्या डोक्या बाहेरच होतं. बहिणींना जरी सांगितलं तरी ते पण हेच शहाणपण शिकवणार होत्या. सगळ्यांनाच माझ्याकडून खूप साऱ्या अपेक्षा होत्या. कसे बसे मी आठ दिवस संपवले. जाताना मात्र मी फार खुश होतो. आईला कळतंच नव्हतं ह्याला काय झालाय ते ? नशीब तिने विचारलं नाही. विचारलं असत तरी मी कुठे खरं सांगणार होतो.

मी रूमवर आलो. डोंबकावळे अजून सुट्टी संपवून आले नव्हते. ते असल्यावर मला अडचण व्हायची पण आज त्यांच्या विना करमत नव्हतं. मी आलो आईने दिलेला डबा खाल्ला. मेस काकांना फोन करून उद्यापासून डबा आणा असं सांगितलं आणि एवढा गाढ झोपलो

कि मला दुसऱ्या दिवशी सकाळीच जाग आली चक्क स्मिता सुद्धा आली नाही स्वप्नात. उठल्या उठल्या डोंबकावळ्यांना फोनकरून कधी येणार विचारलं पण अजून दोन दिवस तरी नाही येणार असं दोघांनी सांगितलं. मला माझी रूम खायला उठली होती. माझा अभ्यास पण तिथे होणार नाही असं वाटत होतं. मी कॉलेजमध्ये जाऊन अभ्यास करायचा ठरवलं. एक्झामच टाइम टेबल आलं होतं. प्रत्येक पेपरला मध्ये एक दिवस सुट्टी हमखास होती आणि माझं नशीब इतक्या जोरावर होतं कि ग्राफिक्स सारख्या माझ्या न आवडत्या विषयाला दोन दिवस सुट्टी होती. लास्ट चा पेपर केमिस्टरी आणि पहिला पेपर M-I. मी केमिस्टरी पासून अभ्यासाला चालू करायचं ठरवलं. प्रत्येक पेपरला तीन दिवस म्हणजे पाच त्रिक पंधरा. परीक्षेला सोळा दिवस बाकी होते म्हणजे M-I च्या पेपर च्या अगोदर चार दिवस M -I -करायचा. चढत्या क्रमाने अभ्यास करायचा ठरवलं. मी केमिस्ट्रीची syllabus कॉपी, quetion पेपर, होत्या नव्हत्या तेवढ्या नोट्स, क्लास नोटबुक सगळं घेऊन कॉलेज गाठलं. मी लॅब्ररीत गेलो. केमिस्ट्रीच बुक घेतलं आणि बरोबर अकरा वाजता अभ्यासाला चालू केलं. समोर syllabus कॉपी ठेवायची. syllabus मधले एक एक पॉईंट शोधून माझ्या स्वतःच्या नोट्स बनवत बनवत स्टडी चालू होता. एक संपला कि दुसरा पॉईंट. सगळ्यात सोप्पा सब्जेक्ट केमिस्ट्री होता बाकी सगळे इंजिनिअरिंगशी रिलेटेड होते. मी होती नव्हती तेवढी पुस्तके चाळली आणि तीन दिवसात केमिस्ट्री चा पडदा फाश केला. आता डोंबकावळे घरून आले होते आणि ते पण माझ्यासोबत लाइब्ररीत येत होते. पण त्यांना जास्त वेळ अभ्यास करवत नसायचं. एक तास झाला कि गप्पा लागायच्या, फिरायला लागायचं. पण माझं तसं नव्हतं मी पार बुडालो होतो अभ्यासात. स्मिता कॉलेज मध्ये आलीय लाइब्ररीत पण आलेली बऱ्याचदा असं विश्वास नि सांगून पण मी कॉन्सन्ट्रेट सोडलं नव्हतं. लायब्ररीत डोंबकावळे डिस्टर्ब करतात म्हणून मी कॉलेजच्या मागच्या लॉन मध्ये अभ्यासाला बसायचो. मी केमेस्ट्री नंतर ग्राफिक्सला फाडलं. किती लाईन प्लेन, आयसो ऑर्थो काढले होते मलाच नाही माहिती. वह्यांचा वह्या भरल्या होत्या. अप्लाइड मेकॅनिक्स , बेसिक इलेक्ट्रिकल इंजिनीरिंग आणि शेवटी घेतलं मॅथ्स. डेरीवेटीव, ईंटेग्रेशन त्या कुंभोजकर च्या बुक चे चार तुकडे होईपर्यंत मी सोडवलं होतं. शेवटी उद्या पेपर म्हणल्यावर आज कॉन्फिडन्स आला होता. कोणाचा बाप जरी आला तरी मला टॉपर येण्यापासून वाचवू शकत नाही. स्मिता दिसायची मला अधून मधून नाही असं नाही. कधी अभ्यासातच येऊन आठवणी सारखी डोकवायची तरीही माझ्या अभ्यासासोबतच तिच्या आठवणींना पण कवटाळून मी अभ्यास केलाच होता. नेहमी प्रेमात सब्जेक्ट बॅक राहिलेले, फेल झालेले, इयर डाउन झालेली मुलं असतात पण मला वाटत मी त्या कॉलेज चा पहिला असेल जो प्रेमाबरोबर अभ्यासात ही तितकाच बुडत होतो. म्हणून डोंबकावळे मला सारखे म्हणायचे, " प्रेमात खरंच,

लय अभ्यास करू वाटत का रे, ह्या राजूचे कळतच नाही भावाला कुठून एवढी energy मिळते. "

प्रेमवेडा होतोच मी पण त्याबरोबर ध्येय वेडा ही होतो. तिच्या प्रेमात पडल्यामुळेच कदाचित मी एवढा एकाग्रही झालो होतो. तिचे सब्जेक्ट राहत असतील पण माझ्या प्रत्येक यशामागे तीच आहे असं वाटत होतं. कदाचित त्यामुळेच मी टॉपरच आलो प्रत्येक परीक्षेत पण त्यामुळेच कि काय प्रेमाचा पेपर मात्र चुकला माझा... प्रेमाच्या परीक्षेत उत्तर लिहिता मला कधी आलीच नाहीत...

परीक्षेचा तो शेवटचा दिवस होता. केमिस्टरी चा पेपर होता लास्ट चा. पेपर संपवून मी बाहेर आलो. महिनाभर जिचं मी व्रत केलं होतं तो उपवास मला आज संपवायचा होता. ती सुट्टीला जायच्या आधी मला डोळे भरून पाहायचं होतं. आज मी ठरवलंच होतं तिला पाहिल्याशिवाय रूमची वाट नाही धरायची. ती माझ्या ब्लॉक मध्ये पण नसायची एक्झाम ला. नेहमी आम्ही वेगवेगळ्या ब्लॉक मध्ये. एकच जागा होती जिथे ती भेटायचे होप्स होते, कॅन्टीन. मी कॅन्टीन च्या स्टेप्सवर जाऊन बसलो. मला आज सगळे कपल्सच दिसत होते. आकाश आणि सुनीता समोरून येत होते. सुनीता म्हणाली, " राजू, इथे बसून वाट बघण्यात काही उपयोग नाही. ती निघालीय घरी. "

*मी: लगेच चालली पण ती घरी*

सुनीता जोर जोरात हसू लागली

*सुनीता : नाही, थांब तिला सांगते जाऊ नको राजुला भेटल्याशिवाय*

आकाश आणि सुनीता दोघेही हसू लागले. मला तडफडत पाहायला आकाशला काय मज्जा यायची देवं जाणे. मी ताडकन उठलो आणि निघालो

आकाश मागून ओरडू लागला, " कुठे निघालास "

मी घरी एवढंच म्हणालो आणि कॉलेज च्या गेटवर जाऊन उभा राहिलो. ती भली मोठी बॅग घेऊन बाहेर आली. तिच्या बरोबर सिनिअर मुली होत्या. त्या तिघींनी एक वडाप थांबवली. त्या तिघी जाऊन मधल्या सीटवर बसल्या मी लगेच मागच्या सीटवर जाऊन बसलो. मी ड्राइवर च्या आरशात पाहत होतो ती दिसते का आणि ती मला त्या आरशात स्पष्ट दिसत होती. तिला पाहायची माझी इच्छा पूर्ण झाली होती. मला कधी टोलनाका गेला कधी भैय्या चौक गेला आणि कधी स्टॅन्ड आलं काही कळलंच नाही. स्टॅण्डवर त्या सेपरेट झाल्या. स्मिता कोल्हापूर प्लॅटफॉर्म वर एकटीच बसली होती कदाचित तिला त्यावेळी माहितीही नसावं जोपर्यंत तिची बस येत नाही मी सोबत होतो तिच्या. तिच्या समोरच्या बाकावर बसून नकळत तिला न्याहरत होतो. शेवटी तिची बस आली आणि ती भुर्रकन उडून गेली. तिला एवढी घाई का व्हायची भुर्रकन उडायची ? हा प्रश्न परत परत मनाला पडायचा. ती गेली कि परत मी एकटा पडायचो. माझं मन एकटं पडायचं. माझे डोळे तेही एकटे पडायचे. त्या डोळ्यावरचा चष्मा तोही एकटा पडायचा, त्यांना पाहायला आता कोण नसायचं. काय होणार होतं माझं. मी काही नसताना तिच्यात एवढा का गुंतत होतो, मला काहीच कळत नव्हतं. नकळत स्टँडच्या दुकानातून गाण्याचा आवाज आला.

*एक लडकी को देखा तो ऐसा लगा...*

*जैसे खिलता गुलाब, जैसे शायर का ख्वाब*

*जैसे मन मी हिरंण जैसे...*

मी सगळं विसरून विचार करायला लागलो, मलाही काहीस असंच वाटलेलं स्मिताला पहिल्यांदा पाहिल्यानंतर.........................

पहिले वर्ष... दुसरे सत्र

दुसरी सेम चालू झाली होती. त्या दिवशी न्यू इयर होतं. कॉलेज गुलाबाच्या बागेसारखं फुललं होतं. मुलंमुली संपूर्ण कॉलेजमधून न्यू इयर सेलेब्रेशन करत होते. मोस्टली कपलच असावेत सगळे पण त्यांच्याकडे बघून छान वाटायचं. मीही रंगायचो स्वप्नात. मी आणि स्मिता पण असच फिरू का ? नकळत माझ्या मनाच्या गाभाऱ्यात बगीचा फुलू लागला होता पण त्या बगिच्यात गुलाब फक्त एकचं होतं 'स्मिता '. कॉलेज मध्ये सॉफ्ट स्किलच ट्रैनिंग होतं आमचं एक वीकच. अश्वांत इन्फोटेक इथून काही टीचर्स आले होते, ते रोज एक जानेवारी ते सात जानेवारी फक्त सॉफ्ट स्किल घेणार होते. डिव्हिजन वाईज प्रत्येक डिव्हिजनला एक स्टाफ होता. आमच्या डिव्हिजनला योगायोगाने मॅडम आल्या होत्या. मॅडम दिसायला फार सुंदर होत्या. त्यामुळे बोर वगैरे होणं असा प्रश्नच येणार नव्हता. सिनिअर कडून ऐकलं होतं, सुंदर मॅडम शिकवायला असल्या कि लेक्चर बोर होतं नाहीत आणि लेक्चर बोर झालं तरी त्यांचे क्लास मिस करू वाटत नाही आणि इलेक्ट्रिकल deptची सिनिअर मुलं मोस्टली नाजनीन मॅडमच लेक्चर ह्यामुळेच बंक करत नाहीत हेही ऐकलं होतं. परत मी स्वतःच विचार करू लागलो. चुकून स्मिता भविष्यात मॅडम झाली तर तिचेही लेक्चर कोणीच बंक करणार नाही. तसं असेल तर मी इंजिनीरिंग पुन्हा करिन असं मला वाटत होतं.

सॉफ्ट स्किलच ट्रैनिंग कम्पलसरी असल्यामुळे सगळा क्लास प्रेझेंट होता. स्मिता होतीच पण आज ती नेहमीपेक्षा वेगळी दिसत होती. तिने व्हाईट कलर चा लाइनिंग चा शर्ट आणि ब्लॅक कलरची जीन्स घातली होती. केस अर्धे मोकळे सोडले होते. नेहमीप्रमाणे केसात बाहुल्यांच्या आकाराच्या पिना होत्या. तिचा चेहरा अधिकच उजळ दिसत होता आणि तिचे ओठ मला नेहमीपेक्षा जास्त गुलाबी वाटत होते. मी जवळ जवळ दहा बारा दिवसांनी तिला पाहत होतो त्यामुळे कदाचित ती मला जास्तच जास्तच छान वाटत असावी, असंही असेल.. मॅडम आमच्या क्लास मध्ये आल्या. त्यांची स्माईल खरचं आम्हाला रिफ्रेश करण्यासारखी होती. त्या अ व्हेरी गुड मॉर्निंग, इतकं गोड म्हटल्या कि सगळे त्यांना मोठ्याने गुड मॉर्निंग म्हणाले. नंतर त्या हैप्पी न्यू इयर टू ऑल म्हणाल्या. सगळ्यांनी मॅडम कडे पाहत हैप्पी न्यू इयर म्हणाले तर मी स्मिता कडे पाहत म्हणालो...

पहिल्या सेशन मध्ये आम्ही सगळे टेन्स शिकलो जे कि आम्ही पाचवीतच शिकलो होतो पण आज पुन्हा एकदा रेवाईज झाल्यावर, आपण इतकं बेसिक खरंच विसरूनच गेलतो हे

समजलं. व्यवस्थित इंग्लिश बोलायचं असेल तर टेन्स किती इम्पॉर्टन्ट आहे हे आज मॅडम नि आम्हाला समजावलं होतं. मॅडम फक्त सुंदर दिसत नव्हत्या तर सुंदर शिकवतही होत्या. एखाद्या कडे सगळेच स्किल असेल तर त्याला आपण सर्वगुणसंपन्न म्हणतो, त्या अगदी तशाच होत्या. त्यांच्या नवऱ्याला किती अभिमान असेल त्यांचा, असं मनाला वाटत होतं. मॅडम इंडिविज्युअल कोणालाही उठवून सेन्टेन्स बनवायला सांगायच्या आणि काय आश्चर्य जेवढी स्मिता अकॅडेमिक मध्ये वाटत नव्हती त्याच्यापेक्षा कितीतरी पटीने ती सॉफ्ट स्किल मध्ये हुशार होती. ती सॉफ्ट स्किलची प्रत्येक उत्तर अगदी अचूक आणि कॉन्फिडन्टली देत होती. तिच्या प्रत्येक उत्तराबरोबर ती अधिक अधिक मनात भरत होती. दुपारनंतर मात्र बोर होऊ नये म्हणून दमशराज वगैरे ठेवायच्या आणि त्यातही ती अगदी बरोबर ऍक्टिंग करायची तसेच मुविची नावही अचूक ओळखायची. मी इमॅजिन करत होतो तेवढी तर ती मठ्ठ नव्हती नक्कीच.

आज सॉफ्ट स्किल ट्रेनिंग चा लास्ट दिवस होता आणि आमच्या फेव्हरेट मॅम आम्हाला सोडून जाणार होत्या. त्या सोडून जाणार ह्याच दुःख तर होतंच पण आता स्मिताचा ऍक्टिव्ह पण अकॅडेमिक मध्ये नाही दिसणार याच जास्त दुःख होतं. एका आठवड्यातच मॅडम नि सगळ्या विद्यार्थ्यांच्या मनात घर केलं होतं. त्या प्रत्येकाला इंडिविज्युअल ओळखत होत्या. प्रत्येकाच्या क्लोज होत्या त्या. त्यांचं प्रेझेंटिन्ग स्किल, त्यांचं बोलणं, त्यांची शिकवण्याची पद्धत , त्यांची बॉडी लँगवेज सगळंच खास होतं. आम्ही मॅडम साठी केक आणला त्यांना F. E, B डिव्हिजन कडून गिफ्ट दिलं आणि आमचा क्लास कायम तुमच्या कॉन्टॅक्ट मध्ये राहील हे आश्वासनही दिलं...

जानेवारी महिना म्हणजे इंजिनीरिंगची खरी मजा हे काही खोटं नव्हतं, स्पोर्ट पासून वेगवेगळे डे, फनफेअर, गॅदरिंग आणि कॉलेजच मॅगझीन. आता फुल धमाल असं आम्हाला वाटत होतं पण फर्स्ट इयर साठी तरीही दोन वाजेपर्यंत कॉलेज कंपलसरी होतं. रोज वेगवेगळा डे असायचा आणि काय आश्चर्य स्मिता प्रयेक डे, डे वाईज costume घालून सेलेब्रेट करत होती. तिने ट्विन्स डेला होस्टेलच्या एकामुलीबरोबर सेम ड्रेसच मॅचिंग करून आली होती. मिसमॅच डेला तर वेडाबाई ने खाली नववारी चा काष्टा आणि वर जीन्स वरचा टॉप, डोक्यावर कॅप, पायात वेगवेगळे शूज, हुबेहूब मिसमॅच वाटत होती. सगळे सिनिअर तिला पकडून पकडून घेऊन जात होते फोटो काढायला पण तुझ्यासोबत फोटो काढू का हे म्हणायची पण हिम्मत झाली नाही माझी. आमच्या परमपूज्य मित्राने विश्वासबाबा ने पण मिसमॅच डे म्हणून वेगळाच पेहराव केला होता. विश्वास बाबा आज चक्क पोत्याचा ड्रेस घालून आला होता. दोन दिवस आधीपासूनच त्याची तयारी चालू होती. आज विश्वासबाबाची पण कॉलेज मध्ये फार हवा

झाली होती. बेस्ट मिसमॅच मध्ये स्मिता, विश्वास आणि आणखीन एक सिनिअर मुलगा जिंकले होते. त्यांचा ग्रुप फोटो पण काढला होता. मनात विचार आला ह्या विश्वास ने सुद्धा स्मिता सोबत फोटो काढला आपल्याला काय " बाबाजींचा टिल्लू ". आता मंद मठ्ठ मीच वाटत होतो जो अकॅडेमिक मध्ये फक्त हुशार होतो खरी ब्रिलिअंट तर स्मिता होती. विश्वास होता. जे जगणं अनुभवत होते. एन्जॉय करत होते. क्लास चा टॉपर असून काय उपयोग आपल्याला एक्सट्रा काहीच येत नाही असं वाटत होतं.

लास्ट डे होता सारी डे आणि खरंच मला त्या दिवशी मी जणू इंद्राच्या दरबारात असल्याचा फील येत होता. मला मेनका उर्वशी असं जे पुराणांमध्ये वर्णन करतात संपूर्ण कॉलेज काहीस तसेच वाटत होतं. सुंदर सुंदर मुली आणि त्यात सारी घातल्यानंतर तर आज सगळ्याच मुली छान वाटत होत्या. मी आतुरतेने वाट पाहत होतो माझ्या अप्सराची. तिला बघून मला दीपिका पदुकोण आठवली. स्मिता केशरी कलरची साडी नेसून, केस मोकळे सोडून, काना पेक्षा जास्त मोठे ते कानातले, चेहऱ्यावर किंचितसा केलेला मेकअप, लाल ओठ लिपस्टिक मुळे आणखीनच लाल दिसत होते, पहिल्यांदाच तिच्या हातात बांगड्या पाहत होतो. कदाचित तिने हाय हिल्स वापरले असावेत त्यामुळे तिची हाईट आज गगनाला भिडत होती. ती कुठल्या तरी पिच्चरची सिरीयलची हेरॉईनच वाटत होती. मी हिरो वाटतो का ह्याचाच मी विचार करत होतो. तिला बघून मला आज विश्वासची शायरी आठवली

" हुसन पे क्या आज जादू चढा है,

तू देखले बस एकबार मुडकर हमको

तेरे दिदार को मै आज तेरे चौखट पे खडा है "

मी आज जवळ जवळ पाठलागच करत होतो तिचा. तिच्या मागे मागे कॅन्टीन मध्ये गेलो बिनकामाची कॉफी मागवली. सोबत बिनकामाचं आकाशला पण घेऊन गेलो, माझी खेचायला परत तिथे डोंबकावले पण आले. नाईलाजाने माझं कॉफी आणि बरच काही होऊन गेलं... माझी नजर आज तिच्यावरून कसलीच हटत नव्हती... झोपताना पण डोळ्यासमोर फक्त आणि फक्त तीच येत होती.

जानेवारी महिना संपला गॅदरिंग संपलं आणि आमचा एन्जॉय पण संपला परत लेक्चर प्रॅक्टिकल ह्यात गुंतलोच होतो कि सेमिस्टर -I चा रिझल्ट लागला. आठवड्या आधी पासूनच रिझल्ट च्या अफवांनी डोकं हँग झालं होतं. सर जसे रिझल्ट घेऊन क्लास मध्ये आले माझाच नाही तर जवळ जवळ क्लास मधल्या सगळ्यांचं काळीज फक्त धड धडच करत होतं. आपल्याला कुठला पेपर कसा गेला, कसा लिहिला, किती पडले असतील, चाळीस तरी पडले असतील का. लाखो प्रश्नांचं एक जाळं. पेपर दिल्यावर सत्तर पडतील असं मी काढलेलं पण आता चाळीस वर येऊन सगळे विचार ठप्प झाले होते. माझी अवस्था अशी तर बाकीच्यांचं काय. शेवटी फुटायचे ते बॉम्ब फ़ुटलेच. मी ऑल क्लिअर विथ ६९. क्लास चा अर्थातच टॉपर. माझा रिझल्ट कळल्यावर अर्थातच मला आता स्मिताच्या रिझल्टची चिंता होती जसे तिचे युनिट टेस्ट मध्ये बॅक राहत होते याप्रमाणेच तीन सब्जेक्ट बॅक राहिले होते. तसं बरच म्हणावं लागेल कारण चार बॅक, पाच बॅक वाले पण भरपूर होते. आकाश चे पण तीन बॅक होते तरी गडी खुश होता कारण चार पाच पेक्षा तीन परवडले.

मला एकचं टेन्शन होतं. स्मिता सेकंड इयरला इन होईल का. तिचे ह्या सेम चे मिळून आठ सब्जेक्ट होतात त्यापैकी तिला पाच काढावेच लागणार होते. तिच्यापेक्षा जास्त काळजी कदाचित त्यावेळी मला लागली होती कारण आता जवळ जवळ माझ्या सगळ्या मित्रांना कळलंच होतं राजू स्मितावर मरतो ते. पण ते स्मिताला तरी कळलं होतं का, तिने अजून तरी क्लास चा टॉपर म्हणून मला नोटीस केलं होतं कि नाही देव जाणे.

आमच्या डोंबकावळ्यांनी तर दिवेच लावले होते. विश्वासरावांचे चार बॅक होते तर दिपकरावांचे तीन. साले माझ्याकडे थ्री इडियट्स च्या राजू आणि फरहान सारखे पाहत होते पण मी काय रानछो नव्हतो अभ्यास न करता टॉपर यायला. मी पीएल मध्ये अक्खी लायब्ररी फोडली होती तसेच माझ्या चष्म्याचा नंबरही ह्या पीएल मध्ये पॉईंट फाईव्ह ने वाढला होता हे डोंबकावळ्यापेक्षा जास्त कोणाला माहिती. तरी साले मित्राचं कौतुक करत नव्हते. विश्वासच आपलं चालूच, " दिप्या, ह्या राज्या इतका अभ्यास मी केला असता ना तर युनिव्हर्सिटी टॉपर आलो असतो. "

माणूस दुसऱ्यावर टीका फार लवकर करतो स्वतःच्या खाली अंधार हे कोणी बघतच नाही मग मित्र का असेना.

मीच पुढे म्हणालो, " मग करायचं ना, कोण अडवलं

विश्वास : अरे भाऊ, हमारे लाईफ में स्मिता नहीं हे ना

दोघेही दात काढून हसत होते नेहमीप्रमाणे आणि मला साल्यांची बत्तीशी काढून हातात देऊ वाटत होती.

अकरा फेब्रुवारी रात्रीचे बारा वाजून एक मिनिट झाला होता आणि साल्यांनी मला माझ्या बर्थडेच सरप्राईज दिलं. मी झोपेतून डोळे चोळत उठलो होतो. आकाश अक्षय आणि दुसऱ्या रूमवरचे मित्र सगळेच मला सरप्राईज द्यायला रात्री बारा वाजता आमच्या रूमवर जमले होते. मला झोपलेल्या कॉट वरून उचलून विश्वास ने खाली केकच्या समोर बसवलं. केकवर नाव टाकलेलं हैप्पी बर्थडे स्मिता. मला धक्का बसण्यासारखं काही नव्हतं कारण ही इंजिनेरींगची थेरी होती. ज्याच्यावर आपला मित्र मरतो त्या मुलीचं नाव केकवर टाकायचं. मलाही ह्या साल्यांकडून असच काहीस करतील याची अपेक्षा होती. फायर कॅण्डल आणि मॅजिक कॅण्डल्स आणले होते. अगोदर फायर कॅण्डल पेटवली ती विझल्यानंतर मॅजिक कॅण्डल्स पेटवल्या आणि मला फुकायला लावलं. मी फुकत असताना माझ्या पाटीत आणि पोटात भयंकर बुक्क्यांचा मार चालू झाला. जोपर्यंत मी कॅण्डल्स विझवत नाहीत तोपर्यंत मारायचं हा पण इथला नियम होता. मॅजिक कॅण्डल असल्यामुळे त्या फुकल्या कि जास्तच पेटायच्या विझायचं नाव काही घेत नव्हत्या. साल्यांनी मला मारून मारून माझा खुळखुळा केला होता. मी बास बास म्हणून ओरडत होतो पण आज काय हे ऐकणाऱ्यातले नव्हते. दिप्या तर असेल नसेल तेवढा सूड मारून मारून घेत होता. मी आज मार खाऊनच मरणार असं वाटत होतं. शेवटी साले मारून मारून थकले आणि नाव घे आणि केक काप हा रिवाज सांगितला. मला मीठ मसाला लावून काय नाव घेता येत नाहीं मी सरळ स्मिता म्हणतो असं मी म्हणालो पण हे साले काय सोडणार होते शेवटी मी नाव घेतलं

*इंजिनीरिंग चा टॉपर मी*

*जगात असतील नसतील तेवढे नालायक मित्र माझे*

*स्मिताच नाव घेतो अक्ख्या कॉलेज मध्ये नाव गाजो माझ्या प्रेमाचे*

मी घेतलेलं नाव सगळ्यांनाच आवडलं होतं. इंजिनीरिंगची ही पद्धत भारी होती, काय माहिती आपण ज्या मुलीवर मरतो तीच नाव घ्यायची संधी आयुष्यात मिळते कि नाही पण ह्या निम्मिताने ती संधी येते ह्यातच आनंद होता. मी मनातल्या मनात लग्नानंतर कसं नाव घ्यायचं ते ठरवत होतो तेवढ्यात विश्वास म्हणाला, " वा यार, ये हुई ना बात " त्याच्या ह्या उत्तरावर दीपक लगेच बोलला, " काय वा, आपल्याला नालायक म्हणाला "

विश्वास सगळं सावरायलाच असायचा, " चलतां हे यार, नालायकही सही, दोस्त तो हे "

मी केक कापला, केक कापताना पण साल्यांनी मला धो धो धुतला

दिवसभर मला बालपणाच्या मित्रांनी, कॉलेज मधल्या, क्लास मधल्या तसेच बस मधल्या मित्रांनी भरभरून विश केलं. पण स्मिताने नाही केलं. करणारच नव्हती. करेल तरी कसं, मुख्यमंत्र्यांना आपण विश करतो पण आपल्याला मुख्यमंत्री का विश करतील ? माझं पण तसंच होतं. ती कुठे ओळखत होती मला...

आज होता चौदा फेब्रुवारी, युवा पिढीचा प्रोपोझ करण्याचा दिवस. आज सकाळपासूनच माझ्या मित्रांनी मला चिडवायला सुरुवात केलती

काय मग, आज प्रपोझ करणार असशील ? रोझ आणलं कि नाही ? कसं करणार प्रपोझ ? गुडघ्यावर बसून का तिच्या डोळ्यात डोळे घालून ? नाही म्हणाली तर वाईट नको वाटून घेऊस... हजार पोरी आहेत कॅम्पस मध्ये. लाखो प्रश्न आणि त्यांची लाखो उत्तरे. पण आज प्रपोझ करायचं असं मी ठरवलंच नव्हतं. मला अजून वेळ हवा होता. ती मला ओळखू लागेल, माझ्याशी मैत्री करेल, तिला माझं प्रेम कळावं एवढा तर वेळ तिला द्यायलाच पाहिजे. उठून कोणी पण प्रपोझ केलं तर कसं हो म्हणेल ती... तिला माझं प्रेम मी दाखवायला पाहिजे... माझ्यासाठी ती किती स्पेशिअल आहे हे दाखवायला पाहिजे. विनाकारण कसं प्रपोझ करणार... चौदा फेब्रुवारी माझा फक्त विचार करण्यातच गेला. ती मला ज्यादिवशी हो म्हणेल तोच दिवस माझ्यासाठी व्हॅलेंटाईन असणार बाकी आपल्या मानण्यात आहे, सगळा दिवस सारखाच. विश्वास, दीपक आणि आकाश आज खूप उत्सूकतेत होते मी प्रपोझ करतो कि काय म्हणून पण मी केलंच नाही म्हणल्यावर साले मला तोंड भरून शिव्या देत होते

विश्वास तर नुसता ओरडत होता, " मर मर तू असाच मर, हिम्मत नाही तर करतो कशाला प्रेम "

पुढे दिप्याचं सुरु झालं, " मी तर तयारी पण केलती ह्याचे डोळे पुसायला दोन दोन रुमाल घेऊन फिरतोय "

आणि परत तिघे हसू लागले. मित्रांना फूल कॉन्फिडन्स असतो आपल्या मित्राचा पोपटच होणार म्हणून पण मला तिचा नकार अपेक्षितच नव्हता. मी फक्त होकाराचीच वाट बघत होतो...

दुसऱ्या सत्राची युनिट टेस्ट पहिली, युनिट टेस्ट दुसरी संपली होती नेहमीप्रमाणे क्लास चा टॉपर मीच होतो. स्मिताचे एक दोन सब्जेक्ट राहतंच होते प्रत्येक टेस्ट मध्ये. बघता बघता प्रीलियम पण संपली होती आणि सबमिशन चालू झालं होतं. आज फिज़िक्स, बेसिक मेकॅनिकल इंजिनीरिंग आणि बेसिक सिविल इंजिनीरिंगच सबमिशन होतं. सबमिशन साठी सर्व असाइनमेंट, मॅन्युअल आणि प्रॅक्टिकल परफॉर्म केलेला असणे गरजेचं होतं. तो दिवस अजूनही मला आठवतो कारण तो दिवस न विसरण्यासारखा नव्हताच. मी एकटाच फिज़िक्सच सबमिशन करण्यासाठी फिज़िक्स च्या लॅब कडे चाललो होतो आणि स्मिता एकटीच फिज़िक्स लॅब मधून बाहेर आलेली. ती माझ्या दिशेनेच चालत येत होती, ती मला क्रॉस करून पुढे जाणार तेवढ्यात मी तिला बोललो, " काय झालं का सबमिशन ? "

तिने किंचित स्माईल दिली आणि " हो झालं " एवढंच बोलली आणि निघून गेली. माझ्या आनंदाला पारावा उरला नव्हता आणि मी आनंदाच्या भरात फिज़िक्स लॅब मध्ये जायचं पण विसरलो आणि कितीतरी वेळ गालातल्या गालात हसत जिन्यावरच बसलो होतो.

आज बसमध्ये जाताना मी डोंबकावळ्यांना पण सांगितलं कि मी तिझ्याशी बोललो. ४४० चा झटका बसल्यासारखे दोघांना आश्चर्य झालं आणि दोघेपण एकाचवेळी मोठ्याने म्हणत होते

" काय सांग्तोय्स काय ? खरं का ?"

पुढे विश्वास म्हणाला, " काय बोललास, प्रोपोझ केलं ?"

*मी :छे रे, सबमिशन झालं का विचारलं*

*विश्वास : काय ? हे विचारलास तू ? ह्याच्या मायला, खुश तर असा आहे जस कि तिर मारून आला, खोदा पहाड, निकाल चुहा. वाटलं आता काय काय बोलला असेल तर सबमिशन झालं का ?*

दुसऱ्या सेमची पीएल सुरु झाली आणि परत महिन्याभरासाठी स्मिताचा मी उपवास केला होता. तरी ह्या पीएल मध्ये अभ्यासातून वेळ काढून तिला पाहायला म्हणून कधीतरी कॅन्टीनला, बाहेर वडापाव खायला जायचो. ह्या सेमचे सब्जेक्ट आता अवघड वाटत नव्हते. इंजिनीरिंग चा फंडा मला कळला होता. अभ्यासाची टॅक्ट म्हणतात ना ती जमत होती. बॅक वगैरे राहण्याची भीती नव्हती. भीती होती ती फक्त स्मिता पुढच्या वर्षी येणार कि नाही याची.

शेवटी आज एक्झाम संपणार होती. फिज़िक्स चा पेपर होता शेवटचा. पेपर संपल्यावर खूप रिलॅक्स वाटत होतं. सगळ्यांच्या चेहऱ्यावर गड जिंकल्याचा आनंद होता, भले रिझल्ट कसा का लागेना. मला वाटलं स्मिता आज घरी जायच्या गडबडीत असेल पण आज ती तिच्या सिनिअर फ्रेंड्स सोबत कॅन्टीन मध्ये निवांत बसली होती. ती आज खूप खुश होती तसे पेपर संपले म्हणल्यावर सगळेच खुश होते. नेहमी शांत अबोल असणारी स्मिता आज तिच्या मैत्रिणीनं सोबत खूप गप्पा मारत होती. ती काय बोलत असेल ह्यापेक्षा तिच्या चेहऱ्यावरचे भाव मला जास्त छान वाटत होते.

मी माझाच विचार करत होतो,

काय दडलंय असं ह्या चेहऱ्यात जो मी ह्या चेहऱ्यात इतका बुडून गेलोय. असं काय आहे तिच्यात कि मी न्यूटनच्या ग्रॅव्हिटेशनल फोर्स सारखं तिच्याकडे आकर्षित होतं चाललोय. तिचा

रोज नवा चेहरा, तिचे रोज नवनवीन उलगडणारे पहलु, तिच्या चेहऱ्यावर रोज नवनवीन बोल, तिच्या डोळ्यात रोज नवे स्वप्न, होईल का कधी मीही तिच्या डोळ्यातलं स्वप्न ? कळेल का कधी माझ्या मनातलं अपार असं क्षितिजासारखं प्रेम तिला? काय होईल माझं जर ती माझ्या आयुष्यात आलीच नाही तर ? माझं मन सावरेल का स्वतःला ? असं मी ऐकलंय कि, " किसी चीज को अगर दिल से चाहो तो पुरी कायनात तुमे उससे मिलाने कि कोशिश मे लग जाती हे "

तिला कदाचित आत्ता नसेल दिसत माझं प्रेम पण माझं प्रेम पाहणाऱ्या ह्या अस्तित्वातल्या प्रत्येक गोष्टीला आज मी विचारतो, दिसतंय का तुम्हाला माझं हे निस्वार्थी प्रेम ? दिसतोय का एक वेडा प्रेमी जो तडफडतोय फक्त प्रेमासाठी. मी विचारतो ह्या निसर्गातील प्रत्येक जीवाला जो माझ्या प्रेमाच्या बगिच्यात माझ्या प्रेमाच्या गुलाबाला पाहण्यासाठी येत होते. दिसतंय तुम्हाला माझं मन ?मी विचारतो माझ्या त्या मनाला जो दिवस रात्र फक्त तिचाच विचार करत होता. मी विचारतो त्या वाहणाऱ्या वाऱ्याला ज्याच्याबरोबर तासंतास मी फक्त तिझ्याविषयी बोलायचो. होईल का कधी मी ह्या प्रेमाच्या परीक्षेत पास? ?????????????????????

पास कि फेल भाग २ लवकरच....

**ई साहित्य प्रतिष्ठानचं हे बारावं वर्षं. सनहा पठाण यांचं ई साहित्यवरचं हे दुसरं पुस्तक.**

सनहा एक प्राद्यापिका आहेत. इंजिनियरिंगच्या. पण मराठी भाषेवर त्याचं प्रेम आहे. आणि आपल्याहातून मराठी भाषेत उत्तम साहित्य निर्माण व्हावं ही तळमळ आहे. त्याला अनुसरून त्यांनी लेखनाचा संकल्प सोडला आहे. सनहाच्या या संकल्पाला बळ देण्यासाठी आपण सर्व वाचक आणि ई साहित्यची संपूर्ण टीम आहे. असे अनेक तरूण लेखक खूप छान लिहीत आहेत. मोठ्या लेखकांच्या तोडीस तोड आहेत. पण त्यांना योग्य असा प्लॅटफ़ॉर्म मिळत नाही. त्यांची पुस्तकं प्रकाशित करायला प्रकाशक धजावत नाहीत. कारण त्यांचे नाव प्रसिद्ध नसल्यामुळे त्यांच्या पुस्तकांची विक्री होईल की नाही याबद्दल प्रकाशक साशंक असतात. आणि जर या लेखकांची पुस्तके वाचकांसमोर आलीच नाहीत तर लोकांना त्यांचे नांव कळणार कसे? या दुष्टचक्रात सापडून अनेक नवतरूण लेखकांच्या पिढ्या बरबाद झाल्या.

पण आता असे होणार नाही. इंटरनेटच्या सहाय्याने नवलेखकांना वाचकांच्या नजरेपर्यंत पोहोचवण्याचे काम आता अनेक संस्था करत आहेत. ई साहित्य प्रतिष्ठान ही त्यातील एक. सुमारे ५ लाखांहून अधिक वाचकांपर्यंत या नवीन लेखकांना नेण्याचे काम ही संस्था करते. पूर्ण विनामूल्य. लेखकांनाही कोणताही खर्च नाही. आणि आज ना उद्या लेखकांना भरघोस मानधन मिळवून देण्यासाठी ई साहित्य प्रतिष्ठानचे प्रयत्न चालू आहेत.

नवीन लेखक यायला हवेत. भक्कमपणे उभे रहायला हवेत. त्यांना त्यांच्या त्यांच्या दर्जानुसार मानमरातब मिळावा. मानधन मिळावे. परदेशातील आणि दूरच्या खेड्यापाड्यांवरील नववाचकांना दर्जेदार साहित्य मिळावे. वाचकांनी त्यांना मनात स्थान द्यावे. त्यांच्या सादेला प्रतिसाद द्यावी.

अनेक नवनवीन ताकदवान लेखक ई साहित्याकडे वळत आहेत. त्यांना त्यांच्या कसानुसार प्रतिसादही मिळतो. कुणाला भरघोस तर काहींच्या वाट्याला टीकाही येते. या टीकेला positively घेऊन हे लेखक आपला कस वाढवत नेतात.

प्रफ़ुल शेजव, भाग्यश्री पाटील, कोमल मानकर, सुरज गाताडे, अनूप साळगावकर, बाळासाहेब शिंपी, चंदन विचारे, सौरभ वागळे, यशराज पारखी, चंद्रशेखर सावंत, संयम बागायतकर, ओंकार झांजे, पंकज घारे, विनायक पोतदार, चंद्रकांत शिंदे, चारुलता विसपुते, कार्तिक हजारे, गणेश सानप, मनोज चापके, महेश जाधव, मनोज गिरसे, मृदुला पाटील, निलेश देसाई, सनहा पठाण, संजय बनसोडे, संजय येरणे, शंतनू पाठक, श्रेणिक सरडे, शुभम रोकडे, सुधाकर तळवडेकर, दिप्ती काबाडे, भूपेश कुंभार, सोनाली सामंत, केतकी शहा, विनिता देशपांडे, सौरभ वागळे असे अनेक तरूण लेखक सातत्यपूर्ण लेखन करत आहेत. ई साहित्यकडे हौशी लेखकांची कमी कधीच नव्हती. आता हौसेच्या वरच्या पायरीवरचे, लेखनाकडे गंभीरपणे पहाणारे आणि आपल्या लेखनाला पैलू पाडण्याकडे लक्ष देणारे, आत्मविश्वासाने भारलेले तरूण लेखक येत आहेत. ही नवीन लेखकांची फ़ळी मराठी भाषेला नवीन प्रकाशमान जगात स्थान मिळवून देतील. त्यांच्या साहित्याच्या प्रकाशाला उजाळा मिळो. वाचकांना आनंद मिळो. मराठीची भरभराट होवो. जगातील सर्वोत्कृष्ट साहित्यिक प्रसवणारी भाषा म्हणून मराठीची ओळख जगाला होवो.

या सर्वात ई साहित्याचाही खारीचा वाटा असेल हा आनंद.

आणि या यशात ई लेखकांचा सिंहाचा वाटा असेल याचा अभिमान.

## बस्स. अजून काय पाहिजे?

आमेन

सुनील सामंत

ई साहित्य प्रतिष्ठान